# आर्थिक आक्रमणाचे चक्रव्यूह
# आणि
# स्वदेशी

दत्तोपंत ठेंगडी

'स्वदेशी जागरण मंचच्या द्वितीय राष्ट्रीय परिषदेच्या (एप्रील' ९४)
बैठकीनंतर पुणे येथे केलेल्या जाहीर भाषणावर आधारित'

# आर्थिक आक्रमणाचे चक्रव्यूह

## आणि

# "स्वदेशी"

- दत्तोपंत ठेंगडी

मोरया
प्रकाशन

★ **प्रकाशक / मुद्रक :**

**दिलीप महाजन**

**मोरया प्रकाशन,**
'संपदा', शास्त्रीनगर,
नगरपालिका दवाखान्याजवळ,
डोंबिवली (प.) ४२१ २०२.

**पुणे शाखा,**
अनुश्री सोसायटी, ४०/१० एरंडवणा,
इंदिरा हाईटस् जवळ, पुणे - ४११ ०३८.

© **दत्तोपंत ठेंगडी**

★ **प्रकाशन : २४ सप्टेंबर ९५**

★ **अक्षर जुळणी :**
उन्नती ऑफसेट,
गोपी सिनेमाजवळ,
डोंबिवली (प.) ४२१ २०२.

★ **मुद्रण स्थळ :**
अजय ऑफसेटस् प्रा. लि.
पुणे. ९.

★ **मूल्य : रु. १०/-**

# आर्थिक आक्रमणाचे चक्रव्यूह

# आणि

# स्वदेशी

स्वदेशीची संकल्पना ही एकोणिसाव्या शतकापासूनच लोकांच्या समोर आलेली आहे. लोकमान्य टिळक, योगी अरविंद, रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, दादाभाई नवरोजी अशा श्रेष्ठ पुरुषांनी प्रतिपादन केलेली आहे. "ती हिंदुंनी टॉलरेटही केलेली आहे. सहन करून घेतलेली आहे. कारण ते फार श्रेष्ठ पुरुष होते. पण स्वदेशीसारखी एक संकीर्ण, नॅरोमाईंडेड कल्पना आज हिंदुसमोर मांडणे हे फार हिंमतीचे काम आहे असे आमचे मित्र मला म्हणाले. कारण ॲव्हरेज हिंदु हा फार प्रोग्रेसीव्ह असतो, फार रॅडिकल असतो, फार लिबरल माईण्डेड असतो आणि स्वदेशी सारखी एक नॅरोमाईंडेड कल्पना तो टॉलरेट करू शकत नाही आणि पुन्हा हे पुणे आहे. तर या ठिकाणी, या ऑडिअन्स समोर स्वदेशीसारखी कल्पना मांडायला तुम्ही उभे राहिलेत तेव्हा तुम्ही फार हिंमतवान असले पाहिजे." असं त्यांनी मला सर्टिफिकेट दिलेले आहे. नाही, वस्तूंच्या स्वरुपामध्ये त्याचं मॅनिफेस्टेशन होतं. इंग्लंडच्या महाराणी. त्यांना असं वाटलं की बुवा ब्रिटीश कार ही काही कंफर्टेबल नाही. जर्मन कार कंफर्टेबल आहे. लोकांनी विरोध केला. सांगितलं की, तुम्ही प्रायव्हेट सिटीझन नाही. तुम्ही आमच्या राष्ट्राचं प्रतीक आहात. तुम्ही जर दुसऱ्या राष्ट्राच्या कारमध्ये प्रवास केलात तर आमच्या राष्ट्राचा अपमान झाल्यासारखा होईल. कार घेऊ दिली नाही. हे स्पिरीट आहे. वस्तूचा प्रश्न नाही आहे, कारचा प्रश्न नाही आहे. आमच्या इथे हो-चि-मिन्ह आले होते. व्हिएटनामचे प्रेसिडेंट होते. ते जेव्हा विमानातून उतरले, तेव्हा त्यांची पँट एका

ठिकाणी शिवलेली कॉरसपॉउण्डटस्नी पाहिली. शिवली होती म्हणजे केव्हातरी फाटली असली पाहिजे. तेव्हा एका कॉरस्पाण्डण्टनं विचारलं की, महाराज, तुमची पँट शिवलेली आहे. हो-ची-मिन्हनी हसून उत्तर दिलं, "माय कण्ट्री कॅन ॲफर्ड ओन्ली धीस मच" हे स्वदेशी स्पिरीट आहे. गांधी-आयर्विन निगोशिएशन्स चालू असताना चहाची वेळ झाली. एकीकडे गांधीजी, एकीकडे आयर्विन. आयर्विन साहेबांकरिता चहा आला. गांधीजींनी सांगितलं तर लिंबू-पाणी त्यांचेसाठी आलं. ते लिंबू-पाणी आल्यानंतर गांधीजींनी मोठ्या आरामात आपल्या लुंगीत हात घालून एक पुडी काढली. आयर्विनसाहेब पहात होते. आरामात आयर्विनच्या समोर ती पुडी उघडली, त्या लिंबूच्या पाण्यात टाकली, ढवळायला लागले. आयर्विननं विचारलं, की काय आहे ? त्यांनी सांगितलं की, दांडी-मार्चच्या वेळेला, तुमच्या चुकीच्या कायद्याचा भंग करून मी जी मिठाची पुडी बनविलेली होती ती मी या लिंबू-पाण्यात टाकली आहे. मिठाच्या पुडीचं महत्त्व नाही, ते स्वदेशी स्पिरीट आहे, स्वदेशी स्पिरीट आहे ! कॅलिफोर्नियामध्ये एकावर्षी संत्र्याचं खूप पीक आलं; आणि तिकडे असं मानण्यात येतं की, जपानी स्त्रियांना संत्री, ऑरेंजिस, फार आवडतात. अमेरिकनं जपानला म्हटलं की, आम्ही तुमच्या बाजारात ऑरिंजेस आणणार. बरं ठीक आहे आणा. तर जपानच्या बाजारामध्ये कॅलिफोर्नियाची ऑरेंजिस, संत्री आली. आणि आपल्याला आश्चर्य वाटेल, नॉट ए सिंगल ऑरेंज वॉज सोल्ड ! तिथल्या स्त्रियांना ऑरेंजिस फार आवडतात, पण एकही ऑरेंज विकण्यात आलेलं नाही, हे स्वदेशीचं स्पिरीट आहे. आपल्या इथे मायकेल जॅक्सन यांना सरकार रेड-कार्पेट ट्रीटमेंट देणार होते. पण ते फारच रॅडिकल असल्यामुळे त्यांचेवर कोर्टखटले वगैरे चालू आहेत. आपण वर्तमानपत्रात वाचले असेल. अमेरिकन संस्कृतीचं प्रतीक असावं असंच शोभणारे ते आहेत. तर या मायकेल जॅक्सनला आमच्यातर्फे रेड-कार्पेट ट्रीटमेंट मिळणार होती. पण चायना आणि कोरियासारख्या देशांनी त्याला लिहिलं की, तुला प्रवेश बंद. आमच्या देशात प्रवेश देणार नाही. कारण तुझं परफॉर्मन्स हे सांस्कृतिक आक्रमण आहे, कल्चरल् इन्व्हेजन आहे. हे जे आहे, हीच स्वदेशी ! ह्याचं नाव स्वदेशी स्पिरीट असं आहे.

आता आपण वर्तमानपत्रात वाचलं असेल की, दादागिरी सर्वत्र चालू असते. जापान अनेक वर्षं अमेरिकेच्या हाताखाली होतं. हळूहळू वाढता वाढता त्यांचा आत्मविश्वासही वाढला. जापानच्या प्रधानमंत्र्यांनी जेव्हा अमेरिकेला म्हटलं की, 'दस फार ॲण्ड नो फर्दर'. तुमच्या बाकीच्या मागण्या आम्ही मानणार नाही आणि अमेरिकेनं म्हटलं मग आम्ही तुमच्याशी तह करणार नाही; आणि जेव्हा जापानच्या प्रधानमंत्र्यांनी म्हटलं, नाही करणार तर तुम्ही घरी वापस जाऊ शकता ! हे स्वदेशी स्पिरीट आहे. आता चायनाचं आपण वाचलेलं असेल. त्यांच्या मानवी अधिकारांमध्ये लूडबूड करण्याचा अमेरिकेने प्रयत्न केला. चायनाने सांगितलं की, हा आमच्या संप्रभुतेचा, सॉव्हरेण्टीचा प्रश्न आहे. आम्ही मानवाधिकारांविषयी काय करावं, न करावं, आम्ही ठरवू तुम्ही त्यांत हस्तक्षेप करू शकत नाही. कारण हस्तक्षेप म्हणजे आमच्या साव्हरेण्टीवर आक्रमण केल्यासारखं होईल. धमकी म्हणून त्यांनी सांगितलं तुमचीजी मूळ मोस्ट फेव्हर्ड नेशन्स स्टेटस आहे ती या जून मध्ये संपते आहे तुम्ही आमचं म्हणणं न ऐकलं तर आम्ही तुमची स्टेटस् संपवून देऊ. यांनी सांगितलं की, तुम्ही स्टेटस् संपवा आम्ही फिकीर करणार नाही. पुन्हा धमकी म्हणून अमेरिकेनं सांगितलं की,'हे जर झालं तर अमेरिकन मार्केट वील बी क्लोज्ड फॉर चायनीज गुडस्.' चायनाने सांगितलं की ठीक आहे. तुम्ही लक्षात ठेवा की, चायनीज मार्केट वील बी क्लोज्ड फॉर अमेरिकन गुडस्. ही जी हिमंत आहे, ह्याचं नाव स्वदेशी आहे. स्वदेशी हे वस्तूचं नाव नाही. उत्तर कोरियावर दादागिरी चालू आहे, न्यूक्लिअरचे बाबतीमध्ये. लहानसा देश आहे. हा लहानसा देश हिंमतीने म्हणतो आहे की, आम्ही आमच्या आमच्या पद्धतीने चालू. तुमचा हस्तक्षेप आम्ही चालू देणार नाही. एवढ्या लहानश्या देशानं चॅलेंज कराव ? आर्थिक व्यवहाराच्या बाबतीमध्ये सातव्या दशकामध्ये, या शतकाच्या, कोरियावर अशीच दादागिरी अमेरिकेनं चालविली; आणि सांगितलं की, आम्ही तुमच्या कृषीमध्ये इन्व्हेस्टमेंट करू इच्छितो. त्यावेळी तिथले संबंधित मंत्री वॉन हॉ यांनी सांगितले की, कृषीमध्ये आम्ही तुम्हाला पाऊल ठेऊ देणार नाही. आम्हाला तुमच्या इन्व्हेस्टमेंटची आवश्यकता आहे. जहाज बनवण्याचा धंदा आणि ऊर्जा म्हणजे एनर्जी यामध्ये आम्हाला तुमच्या इन्व्हेस्टमेंटची आवश्यकता आहे. अमेरिकेने

सांगितलं की, आम्ही या धंद्यात, दोन्ही धंद्यात इनव्हेस्टमेंट करु शकतो. आणखी धंद्यात इनव्हेस्टमेंट करु शकतो. आमची शर्त ही आहे की आम्हाला कृषी मध्ये इनव्हेस्टमेंट करु दिली पाहिजे. वॉन हॉ सारख्या छोट्याश्या देशाच्या मंत्र्याने सांगितले "तुम्हाला कृषी मध्ये आम्ही इनव्हेस्टमेंट करु देणार नाही. बाकी ठिकाणी इनव्हेस्टमेंट करायची असेल तर करा नाहीतर करू नका याची आम्हाला फिकीर नाही." आता एक दीड - दोन महिन्यांपूर्वी जी ईस्ट एशियन लोकांची कॉन्फरन्स झाली त्या कॉन्फरन्स मध्ये महातीर महंमद मलेशीयाचे यांनी या आधी लिहिल की अमेरिकेला ऑब्झर्वर म्हणून सुद्धा बोलवू नका. पण बाकी लोकांनी दडपणाखाली त्यांना बोलावल. खुल्या कॉन्फरन्स मध्ये महावीर महंमदने,अमेरीकेच्या प्रतिनिधीला सांगितलं होत की ही तुमची शुद्ध बुलींग टॅक्टिक्स् आहेत. बुलिंग टॅक्टिक्स् मलेशिया सहन करणार नाही. मलेशिया सारखा छोटा देश म्हणू शकतो. हे स्वदेशी स्पिरीट आहे. ऐंशी कोटीचा प्रधान मंत्री म्हणू शकत नाही. मलेशियाचा प्रधानमंत्री म्हणू शकतो की तुझी ही गुंडागर्दी, बुलींग टॅक्टिक्स चालू देणार नाही. हे स्वदेशी स्पिरिट आहे.

स्वदेशी ही जी वस्तू आहे ही स्वदेशी वस्तू ही स्पिरिट आहे. केवळ वस्तू नाही ही एक जीवन पद्धती आहे. प्रत्येक देशामध्ये स्वदेशीचा विचार असलाच पाहिजे. प्रत्येक मानवी समूहात स्वदेशीचा विचार असलाच पाहिजे. आणि स्वदेशीच्या विचारांनी आपल्या राष्ट्रीय हिताच संरक्षण करण्याकरता कटिबद्ध अशा प्रकारच्या सर्व मानवी समूहांनी ऑन इकवल फुटिंग, परस्परांशी सहाय्य करावे हे ग्लोबलायझेशन आहे. ते सिंगापुर सारखे एक लहान राष्ट्र असो किंवा अमेरिके सारखं मोठ असो मानव समूह स्वतंत्र आहे. तो स्वायत्त आहे. त्याची अस्मिता आहे. दादागिरी म्हणजे ग्लोबलायझेशन नाही सुपर थ्रि हंड्रेड ॲण्ड वन्, स्पेशल थ्री हंड्रेड ॲण्ड वन्, या नावाखाली आणि आर्म ट्विस्टींग करणे हे जे दानवी प्रकार आहेत, मागासलेले, रानटी प्रकार आहेत हे ग्लोबलायझेशन नाही. खरं ग्लोबलायझेशन म्हणजे हिंदू कन्सेफ्ट मध्ये जे आहे. तेच ग्लोबलायझेशन मध्ये आहे. त्यामुळे स्वदेशी ग्लोबलायझेशन या गोष्टी साधारण अशिक्षित माणसाला तर चांगल्या माहित

आहेत. आमची अडचण या सुशिक्षित, रॅडिकल, प्रोग्रेसिव्ह, लिबरल माणसाविषयीची आहे की, त्याला स्वदेशी समजवून सांगायचं कसं. कारण या सुशिक्षित , लिबरल माणसांच्या मनाचं स्ट्रक्चर निराळं असतं हा सुशिक्षित माणूस जमिनीपासून कटलेला आहे. ॲलियनेटेड फ्रॉम दि सॉईल. हवेत आहे कुठ तरी. पाश्चिमात्य लोकांच्या प्रभावाखाली आहे. आपण आपल्या लोकांपासून, जमिनीपासून, संस्कृतीपासून कटलेले आहोत या गोष्टीचा त्यांना अभिमान आहे. याचं त्यांना फार वाईट वाटत नाही. आणि म्हणून हवेमध्ये उड्या मारण्याची त्यांची प्रवृत्ती आहे. त्यामुळे फार लिबरल आहेत. आम्हाला लिबरल लोकांशी बोलण्याचं दुर्भाग्य पुष्कळवेळा प्राप्त होतं. असं दिसतंय की, आमच्या सारख्यांनी या लोकांशी बोलण्यामध्ये काही मतलब नाही. कारण त्यांचे नॉर्म्स ॲण्ड स्टँडर्डस् निराळे आहेत. आमचे नॉर्म्स आणि स्टँडर्डस् निराळे आहेत. कुणी जर असं म्हटलं, की, आपल्या राष्ट्राच्या हिताचं संरक्षण केलं पाहिजे. ते लोक नाकं मुरडतात. नॅरो माईण्डेड. तुम्ही जर असं म्हटलं की, इतर देशांच्याकरता आपण राष्ट्रहित बळी द्याला पाहिजे. हां ! हा खरोखर उदारमतवादी मनुष्य आहे. ॲप्रिशिएशन. म्हणजे यांच्या नॉर्म्स अँड स्टँडर्डस्चा जर विचार केला आणि सगळा इतिहास शोधला, मला वाटतं सगळाच लिबरल् माईण्डेड मनुष्य पृथ्वीराज चव्हाणच होता. किती लिबरल? सोळांदा घोरीचा पराभव केला. सोळांदा त्यानं अभिवचन दिलं. सोळांदा मोडलं तरी पुन्हा त्याला सोडलं इतरा लिबरल मनुष्य जगाच्या इतिहासात झाला नाही. या माणसाचं ॲप्रिशिएशन आमच्या या जमिनीपासून कटलेल्या लोकांना आहे की, काय लिबरल मनुष्य आहे ! वॉरन् हेस्टींग्जने कितीतरी वचनभंग केले. आमच्या इथं म्हटलेलं आहे की, रघुकुल रीत सदा चली आयी, प्राण जाय पर वचन न जाय. ती जुनी पुराणी गोष्ट झाली. वचनभंग करणं ही मॉडर्न फॅशन आहे. तेव्हा वॉरन् हेस्टींग्जनं वचनभंग केला आणि इथल्या लोकांवर फार अत्याचार केले. त्याच्याविरुद्ध बोलायला बंगालमधला सुशिक्षित मनुष्य त्यावेळी कोणी पुढे आला नाही ! इंग्लंडच्या लोकांना जेव्हा ती बातमी कळली की, वॉरन् हेस्टींग्जनं काय केलं, तेव्हा ते त्याच्या विरुद्ध गेले, पार्लमेंटसमोर त्याला आणलं,खटला चालला, इंपीचमेंट झालं. इंग्लंडच्या लोकांना राग आला. आमच्या लिबरल लोकांना राग आला नाही.

मोअर् लोयल् दॅन हिज् मेजस्टी ! चौ-एन्-लाय इथं आले. तह झाला. जवाहरलालजी आणि चौ-एन्-लाय् दोघेही फारच लिबरल माईंडेड आहेत असं म्हणण्यात आलं. ॲप्रिशिएशन आहे. तेव्हा काही वास्तववादी लोकांनी म्हटलं आहे की, अरे हे फसवं आहे, हे नाटक आहे. याची बॅकग्राऊंड लक्षात घेतली पाहिजे. केवळ डंकेलचा अलग विचार करून चालणार नाही. इट इज द पार्ट ऑफ होल्. ही कडी आहे एका शृंखलेची. आणि या शृंखलेचा प्रारंभ दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटानंतर होत आहे. माझ्या वयाचे जे लोक आहेत त्यांनी या शतकाच्या पाचव्या दशकामध्ये एक शब्द वारंवार ऐकला असेल, 'न्यू इंटरनॅशनल इकॉनॉमिकल ऑर्डर - नवीन आंतर्राष्ट्रीय आर्थिक व्यवस्था.' हे काय आहे ?

दुसरं महायुद्ध संपलं. आंतर्राष्ट्रीय परिस्थीतीच्या दबावामुळे गोऱ्या, सफेद साम्राज्यवादी देशांना, हे भाग पडलं, की त्यांनी आपल्या उपनिवेशांना स्वातंत्र्य द्यावं. इच्छेनं नाही पण परिस्थितीमुळे. तसं त्यांनी स्वातंत्र्य दिलं. जगाचा नकाशा आज जसा आहे, संयोगाची गोष्ट आहे, को-इन्सीडन्स आहे, की, हे जेवढे गोरे, सफेद साम्राज्यवादी देश आहेत हे या नकाशामध्ये सगळे उत्तरेमध्ये आहेत. आणि बाकीचे जे देश आहेत, गैरगोरे, आणि पूर्वीचे उपनिवेश वगैरे असलेले ते सगळे दक्षिणेमध्ये आहेत. म्हणून टर्मिनॉलॉजी सगळ्यांना माहीत आहे की उत्तरेकडील देश आणि दक्षिणेकडील देश असे म्हणतात. उत्तरेकडील देश म्हणजे सफेद साम्राज्यवादी, पूर्व साम्राज्यावादी, दक्षिणेकडील म्हणजे त्यांचे उपनिवेश, राहिलेले, गैर गोरे लोकांचे देश अशी टर्मिनॉलॉजी आलेली आहे तर स्वातंत्र्य द्यावं लागलं तो पर्यंत सगळे ह्या संभ्रमामध्ये होते की हे सफेद साम्राज्यवादी देश हे फार ऐश्वर्य संपन्न देश आहेत. त्यावेळेला त्यांच ऐश्वर्य होतं ते साम्राज्यशाही-साम्राज्यवादी शोषणांच्या भरवशावर होते. त्यांची समृद्धी ही स्वत:च्या पायावर उभी राहिलेली नव्हती. तर आपल्या उपनिवेशांचे शोषण करुन ते समृद्ध होते. उपनिवेशांना स्वातंत्र्य मिळाल्यावर शोषणाची प्रक्रिया बंद झाली, आणि प्रक्रीया बंद झाल्यावर त्यांच्या लक्षात आलं की स्वयंपूर्ण स्वावलंबी अर्थ व्यवस्था नसल्यामुळे आपली स्वत:ची अर्थव्यवस्था कशी सांभाळायची हा

प्रश्न त्यांच्या डोळ्यासमोर उभा राहिला. आणि त्यांच्या हे लक्षात आले की ते स्वावलंबी होऊ शकत नाहीत, कारण त्यांच्याकडे बऱ्याच ठिकाणी इतके नॅचरल रिसोर्सेस नाहीत. बाकीच्या गोष्टी आहेत. आणि हे आपल्याला माहीत आहे की सगळे देश हे मटेरिॲलिस्टिक आहेत. मटेरिॲलिस्टिक असल्यामुळे मटेरियालिझम् मध्ये एक स्वयं विरोध आहे. इंटर्नल सेल्फ कॉंट्रॅडिक्शन की रिसोर्सेस फॉर दि प्लेनेट आर् लिमिटेड, ह्युमन डिझायर्स आर अनलिमिटेड. संपूर्ण पृथ्वीचे जे साधन स्त्रोत आहे ते सीमित आहे. मनुष्याच्या वासना असीमित आहेत. त्यातून अनंत भानगडी उत्पन्न होतात. जपान विषयी अस म्हणतात की जपानजवळ आपल साधनस्त्रोत नाही की काही नाही. पण जपान इज ए पुअर कंट्री वुईथ रिच पिपल. आमच्याकडे साधन स्त्रोत खूप आहेत. म्हणून म्हणतात की भारत इज ए रिच कंट्री वुईथ पुअर पिपल. तर साधन स्त्रोत कमी बाकी गोष्टी कमी नाहीत. अर्थ व्यवस्था टिकवायची म्हटली तरी पूर्वी प्रमाणे कोणाचं ना कोणाचं शोषण चालू ठेवण आवश्यक आहे. कसं ते चालू ठेवता येईल  या विषयीच्या युक्त्या त्यांनी शोधल्या. त्यांचेकडे एक्सपर्ट्स् आहेत. आणि अमानुष गोष्टींसाठी तर त्यांच्याकडे एक्सपर्टची संख्या भरपूर आहे. तेव्हा शोषण कस चालवता येईल त्यादृष्टीने योजना सुरु झाल्या. आणि त्या करिता तीन एजन्सीची निर्मिती करण्यात आली. इण्टर नॅशनल मॉनेटरी फण्ड, वर्ल्ड बॅंक आणि बहुराष्ट्रीय मल्टी नॅशनल कंपन्या या तिघांच्या तर्फे या शोषणाची प्रक्रीया सुरु झाली. तो भाग इथे फार लांबण्याचे कारण नाही. या तीन एजन्सी त्यांच्या होत्या. हे शोषण सुरु झाल पण तेवढ्याने त्यांची गरज भागण्यासारखी नाही. हे त्यांच्या लक्षात आलं. खास करून अमेरिकेच्या. तर एक चौथी जी आंतर्राष्ट्रीय एजन्सी तयार करण्यात आली होती. जनरल् ॲग्रीमेंट ऑन् टॅरिफ ऑफ ट्रेड. याचाही उपयोग शोषणाकरिता अधिक करता येईल का ? हा विचार सुरू झाला. वास्तविक, शोषण त्या एजन्सी मार्फतही चालू होतं. जनरल ॲग्रिमेंट ऑन् टॅरिफ ऑफ ट्रेड, गॅट, या संस्थेचं किंवा एजन्सीचं निर्माण १ जानेवारी १९४८ ला झालं. आणि त्यांच्या अजेंड्यावर इण्टरनॅशनल् ट्रेड अॅंड गुड्स् हा विषय होता. एकमात्र विषय होता. आणि आंतर्राष्ट्रीय व्यापारांत परस्परांना सोय व्हावी म्हणून आम्ही

व्यवस्था केली आहे असं म्हणण्यांत आलं. असं जरी म्हटलं तरी विकसनशील देश म्हणजे दक्षिणचे देश थर्ड वर्ल्ड कंट्रीज, नव स्वतंत्र देश हे अनुभव करीत होते की, गॅटच्या मार्फत जो व्यवहार चालतो तो आमच्यावर अन्याय करणार आहे. इन्-इक्विटस् असं त्यांनी म्हटले आहे. इन-इक्विटस् म्हणजे अन्यायकारक, विषय असा व्यवहार आमच्यांशी होतो. म्हणून १९७२ मध्ये या विकसनशील देशांनी एकत्र येऊन विकसित देशांना असं म्हटलं की, हा तुमचा व्यवहार, इकॉनॉमिक अॅरेंजमेंट, अन्यायाची आहे, हा अन्याय दूर करा. नऊ वर्षानंतर १९८१ मध्ये मेक्सिकोच्या कुंकुम मध्ये विकसित देश एकत्र आले. आणि त्यांनी असं सांगितलं, विकसनशील देशांना, की, तुम्ही म्हणता ते खरं आहे. त्यांनी मान्य केलं, की, अन्यायकारक आहे तुमच्या करिता; परंतु या इकॉनॉमिक अॅरेंजमेंटमध्ये आता काही बदल होऊ शकत नाही. आपण मोठ्या उद्देशाकडे चाललो आहोत त्या उद्देशाचं नाव आहे, ग्लोबलायझेशन. तेव्हा हे ग्लोबलायझेशनचं महान उद्देश्य साध्य करण्याकरता तुम्हाला हा अन्याय सहन करायला लागेल, असं स्पष्टपणाने, निर्लज्जपणाने १९८१ मध्ये कुंकुमला विकसित देशांनी विकसनशील देशांना सांगितलं. चालू होत, पुढे एक नवीन डेव्हलपमेंट व्हायला लागली. आपल्या इकडे पुष्कळांना त्यावेळी त्याची कल्पना नव्हती. सहाव्या दशकापासून अमेरिकेची अर्थव्यवस्था खाली जायला लागली. १९७३ पर्यंत ही व्यवस्था बरीच खाली गेली. वरून एकदम लक्षात येत नव्हतं. १९७४ मध्ये त्यांना एक अॅक्ट, कायदा पास करावा लागला. ही कोसळणारी अर्थव्यवस्था सांभळण्याकरता ! काही काळ त्यांनी धीर धरला. पण पुढे असं लक्षांत आल की, या अॅक्टमुळे सुद्धा आपण फार काळ टिकणार नाही. म्हणून १९८८ मध्ये, ओम्नीबस ट्रेड अॅक्ट हा करावा लागला. म्हणजे अमेरिकेची अर्थव्यवस्था, गोईंग डाऊन हिल् अशी ह्या स्थितीमध्ये होती. याच्यामध्ये काय झालं, की, गॅटच्या अजेंड्यावर पूर्वी जो इंटरनॅशनल ट्रेडींग गुड्स् हा एकच आयटेम होता, तो बऱ्याचशा गुडस्च्या बाबतीमध्ये स्पर्धाक्षमता, कॉम्पीटेटीव्हनेस हा अमेरिकेचा कमी झाला. त्यामुळे जे लॉसेस व्हायला लागले ते कॉम्पेन्सेट कसे करावयाचे ? तर त्यांच्या एक्स्पर्ट्स्नी असं सांगितलं की, आपण

अजेंड्यावर दुसरा एक विषय आणू. तो म्हणजे ट्रेड-इन्-सर्व्हिसेस. सर्व्हिसेस म्हणजे बँके, इन्शुअरन्स, फायनान्शीयल इन्स्टिटयूशन्स, टेली कम्युनिकेशन, ट्रान्सपोर्ट, एज्युकेशन वगैरे ज्या निरनिराळ्या सर्व्हिसेस् आहेत. हा त्यांनी विषय आणल्याबरोबर विकसनशील देशांनी असं म्हटलं की, अरे हा तर मूळच्या अजेंड्यामध्ये विषय नव्हता. तुम्ही नवीन कसा आणला ? ते म्हणाले, ठीक आहे, नव्हता खरं आहे पण आता परिस्थितीची आवश्यकता आहे. तर यांनी असं म्हटलं हा जर नवीन विषय आणायचा असेल तर आम्हाला विचार करू द्या. हा नवीन टर्म आहे; ट्रेड-इन्-सर्व्हिसेस्. पहिली ह्याची व्याख्या तर करा. डेफिनिशन याची आपण तयार करूया. विकसनशील देशांना म्हटलं... गोऱ्या देशांनी अरे डेफिनिशनच्या काय भानगडीत पडतो. डेफिनिशनच्या या अॅकेडमिक चर्चेमध्ये दोन वर्ष निघून जातील. ग्लोबलायझेशन काण्ट वेट दॅट लॉंग टाईम, तितका वेळ वाट पाहू शकत नाही. असं करू आपण निगोशिएशन्स सुरु करून देऊ. डेफिनिशन वगैरे इन-कोर्स-ऑफ निगोशिएशन्स होईल तसे होईल. काही दुसऱ्या विकसनशील देशांनी असं म्हटलं की, असं नाही. आमच्या देशाची आम्हाला स्टॅटिस्टिक्स गोळा करावी लागलील. त्या ट्रेड-इन्-सर्व्हिसेस्चा आमच्या देशावर काय परिणाम होणार? ते म्हणाले की, तुमच्या देशातलं स्टॅटिस्टिक्स गोळा व्हायला चार वर्षे लागतील. तितकावेळी ग्लोबलायझेशन वाट पाहू शकत नाही. एवढं पवित्र, उदात्त ध्येय चार वर्षं वाट तरी पाहू शकतं ? निगोशिएशन्स सुरु करा. तुमचे तुही स्टॅटिस्टिक्स गोळा करा. करू नका हा तुमचा प्रश्न आहे, पण, निगोशिएशन्स सुरू करू. म्हणजे कशी दडपशाही चालते. बुलींग टॅक्टिक्स्. इथे आमचे पुढारी जेव्हा भाषणे करतात, तेव्हा अशा थाटात करतात की, अरे अमेरिकेला आम्ही काय समजतो, याला काय समजतो, त्याला काय समजतो. आमच्या इकडे म्हण आहे खेड्यामध्ये, की, अपने गलीमे कुत्ता शेर असे आम्ही लोक भाषणे करतो. इथे, पण तिथे जनरल कौन्सिलमध्ये गॅटच्या या लोकांचं तोंड उघडत नाही. ग्रुप मीटींगमध्ये बोलतात. पण जनरल कौन्सील मध्ये बोलण्याची या लोकांची हिंमत होत नाही, ही एक पाहण्यासारखी गोष्ट आहे. ट्रेड-इन्-सर्व्हिसेस् अजेंड्यावर आला. पण थोड्या वेळाने हे लक्षात आलं, जसं घसरणीला लागलेला गाडा एकदां घसरणीला

लागला की, त्याला आवरणं कठीण होतं तशी अमेरिकेची स्थिती झालेली आहे. आज ही गोष्ट खरी आहे की, अमेरिका सगळया जगावर आपलं आर्थिक साम्राज्य स्थापण्याचा प्रयत्न करते आहे. परंतु ही गोष्ट अशी नाही आहे, पूर्वी जे स्थापन करण्याचा प्रयत्न करीत असत, दे वेअर टॉकींग फ्रॉम द पोझिशन ऑफ स्ट्रेंग्थ; अमेरिकेची ही गोष्ट नाही आहे. अमेरिका इज स्ट्रायव्हींग फॉर इटस् व्हेरी सर्व्हायव्हल ! चारपर्सेंट लोक जगाच्या चाळीस (४०) पर्सेंट साधन स्रोतांचं कन्झम्प्शन करताहेत. अमेरिकेला जिवंत रहायचं असलं तरी, कारण ही जी सेल्फ काँट्रॅडिक्शन आहे की, अन् लिमिटेड ह्यूमन डिझायर्स आणि लिमिटेड रिसोर्सेस ह्या काँट्रॅडिक्शनमधून जिवंत राहयचं असेल, आजची स्थिती आहे की, तर केवळजीवंत राहण्याकरिता सगळ्यांना आपले गुलाम बनविणं आणि त्यांचं शोषण करून त्यांना खतम् करणं ही अमेरिकेची सर्व्हायव्हलची आवश्यकता आहे आणि मी हे आपल्याला अत्यंत जबाबदारीनं सांगतो आहे, की आज जरी अमेरिका इतका मोठा वाटत असला तरी, आमच्या इथे जे धर्मामध्ये म्हटले आहे की, जी जी गोष्ट धर्माच्या, जेजे व्यक्तिगत जीवन, समाजजीवन, किंवा व्यवस्था, सिस्टीम् धर्माच्या ऑरबिटच्या अंतर्गत असेल त्यामध्ये कधीही इण्टर्नल सेल्फ कॉन्ट्रॅडिक्शन, आंतरविग्रह निर्माण होत नाही. पण जे जे व्यक्तिजीवन, समाजजीवन, सिस्टीम व्यवस्था, ही धर्माच्या ऑरबिटच्या बाहेर असेल त्यामध्ये अंतर्विरोध, इंटर्नल सेल्फ काँट्रेडिक्शन निर्माण झाल्याशिवाय रहात नाही. आणि आपल्या इंटर्नल सेल्फ काँट्रेडिक्शनच्या भाराखाली दबून असं व्यक्तिजीवन, समाजजीवन आणि सिस्टीम समाप्त होते. बाहेरच्या आक्रमणाची त्याला आवश्यकता नसते आमि ह्या दृष्टीनेच आधीासून आम्ही जे हिंदुत्ववादी लोक आहोत, आम्ही असं म्हणत असू की, कम्युनिझमही टिकायचा नाही, कॅपिटलिझमही टिकायचा नाही. हे मी त्यावेळेला म्हणत होतो की, ज्या वेळेला एक-तृतीयांश जगावर लाल बावटा फडकला होता. त्यावेळेला आम्ही म्हटलं होत. हे काही आम्ही या अर्थी म्हटलं नाही की, आमची ताकद आहे, आम्ही त्यांना हटवू. नाही, आम्हाला हे माहीती होतं की, हे स्वत:च बुडणार आहेत. आपल्या इंटर्नल-सेल्फ-काँट्रॅडिक्शनमुळे. कारण कॉम्युनिझम असो, कॅपिटॅलिझम असो, हे दोन्ही एकाच गोत्राचे आहेत. आपल्याकडे जसं आहे की, माझं गोत्र

गौतम आहे, गौतम, आंगिरस, आयाचित हे प्रवर आहेत. मटेरिॲलिझम हे गोत्र आहे. त्याचे दोन प्रवर आहेत. एक कॉम्युनिझम, एक कॅपिटॅलिझम. पण गोत्र दोघांचं एकच आहे. जास्तीतजास्त सन २००० हे वर्ष येईपर्यंत अमेरिकेचं आजचं स्थान नष्ट झालेलं असेलच. कॅपिटॅलिझम, ॲज सिस्टीम, ही कोलॅप्स झालेली असेल, मी आपल्याला आश्वासनपूर्वक सांगू शकतो. तेव्हा या पद्धतीने हे खाली जायला लागलेत.

ट्रेड-इन्-सर्व्हिसेस्नी होत नाही असं म्हटल्याबरोबर, त्यांच्या एक्सपर्टसनी आणखी, बुडत्याला काडीचा आधार म्हणून, तीन नवीन गोष्टी हाती घेतल्या. त्या म्हणजे ट्रेड-इन-ट्रेड-रिलेटेड-इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राईटस्, ट्रेड-इन-ट्रेड-रिलेटेड-इन्व्हेस्टमेंट मेझर्स आणि ॲग्रिकल्चर. हे तीन विषय गॅटच्या टेबलवर आणायचे हा त्यांनी आग्रह धरला. इतरांनी विरोध केला तरी त्यांनी ते जबरदस्तीने आणले. आतां आपल्याला ही नवीन इन्फर्मेशन. काही लोकांना माहिती असेल, नसेल. ह्यांनी सुद्धा अमेरिकेचं हे खाली जाणारं गांडं सावरत नाही असं दिसल्यावर, त्यांनी आता हवेमध्ये वावड्या उडवायला सुरुवात केली आहे की, आणखी दोन विषय आणले पाहिजेत.कोणते ? पर्यावरण आणि मजुरांचे हक्क. हेसुद्धा पुन्हा त्या गॅटच्या निगोशिएशन टेबलवर आणले पाहिजेत असं म्हटलेलं आहे. तेव्हा हा गेम काय आहे. हे आपण लक्षात घ्या. मला प्रत्येक गोष्ट डीटेलमध्ये जाणं शक्य नाही आहे. पण हा गेम जो आहे तो अमेरिकेला वाचविण्याकरिता आहे. आणि एकामागून विषय त्या टेबलावर यायला लागलेले आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांमध्ये, गेल्या काही वर्षांमध्ये हे एक डंकेलचं वातावरण सुरू झालेलं आहे. कारण गॅट हे तर १९४८ पासून होतं. थोडं शोषणही सुरु होतं. लोकांनी थोडा प्रोटेस्ट केला. तो मानण्यात आला नाही. तरीपण लोकांनी म्हटलं हे सहनशक्तीच्या बाहेरचं नाही. आता जेव्हा हे सहनशक्तीच्या बाहेरचं झालं, तेव्हा लोकांनी प्रोटेस्टचा आवाज उठवायला सुरुवात केली. ही एक वस्तुस्थिती आपण ध्यानात घ्यायला पाहिजे. संपूर्ण विश्लेषण सायंटिफिक, करावं वगैरे असं जे म्हणतात, मला आपल्याला हे म्हणायच की, डॉक्यूमेंट पूर्णपणे वाचल्यानंतर, काही गोष्टी अशा आहेत की, केवळ डॉक्यूमेंट बोलून चालणार

नाही. आम्ही हा डॉक्यूमेंट पूर्णपणे पाहिला आहेच. स्क्रूटीनी केलेली आहे. कुणाशीही याच्याविषयी शास्त्रार्थ करायला आम्ही तयार आहोत. तर अशा बैठकीमध्ये चार-पाच प्रश्न विचारून या सभेमध्ये होणार नाही. आम्ही दहा तास याच्यावर शास्त्रार्थ करायला तयार आहोत. अर्थाने कुणी असा शास्त्रार्थ करणार असल्यास. परंतु यापेक्षा अधिक महत्त्वाच्या गोष्टी ज्या आमच्या लक्षात आल्या त्या जास्त रेलेव्हंट आहेत असं मला वाटतं. पहिली गोष्ट अशी लक्षात आली, विशेषत: की, या संघर्षाचं स्वरुप काय झालेलं आहे. एकतर हा, आमच्या दृष्टीने, हा स्वातंत्र्याचा दुसरा संग्राम आहे. सेकंड वॉर ऑफ इंडिपेडन्स. पहिला संग्राम १९४७ मध्ये संपला. आता हा आर्थिक स्वातंत्र्याचा लढा, आमच्या स्वातंत्र्याचा, हा दुसरा संग्राम आता सुरू झालेला आहे. परंतु हा अभूतपूर्व आहे. अभूतपूर्व आहे या दृष्टीनी, की, अशा प्रकारचा संग्राम आतापर्यंत इथे झाला नाही, जगातही झाला नाही. याचं अभूतपूर्व स्वरुप काय आहे, पहा. पहिली गोष्ट अशी आहे की हा आमच्याकरिता जरी स्वातंत्र्याचा संग्राम असला तरी, ही लढाई केवळ राष्ट्रीय स्तरापर्यंत सीमित नाही. हे आंतर्राष्ट्रीय युद्ध आहे. धिस इज् दि थर्ड वर्ल्ड वॉर ! थर्ड वर्ल्ड वॉर ! या सेंच्युरीमध्ये दोन वर्ल्ड वॉर झालेली आहेत. ते दोन वर्ल्ड वॉर्स मिलिटरी वेपन्सच्या सहाय्याने लढण्यात आले. हे तिसरं वर्ल्ड वॉर इकॉनॉमिक वेपन्सच्या सहाय्याने लढण्यात येत आहे. पण हे थर्ड वर्ल्ड -वॉर आहे, आणि या थर्ड वर्ल्ड वॉरमध्ये सारे उत्तरी देश एकीकडे आणि सारे दक्षिणी देश एकीकडे अशा प्रकारची ही लढाई आहे. आणि आमचा हा जो दुसरं राष्ट्रीय स्वातंत्र्य संग्राम आहे. हा आमचा दुसरा राष्ट्रीय स्वातंत्र्य संग्राम, हा या तिसऱ्या जागतिक महायुद्धाचा एक भाग, पार्ट ॲण्ड पार्सल ऑफ दि थर्ड वर्ल्ड वॉर ऑन वुईथ इकॉनॉमिक वेपन्स. जागतिक तृतीय महायुद्धाचा एक भाग म्हणून आपला हा राष्ट्रीय स्वातंत्र्य संग्राम आहे. अशा प्रकारचं हे युद्ध झालेलं नव्हतं. हे नवीन प्रकारचं युद्ध आहे, ही गोष्ट आपण लक्षात घ्या. ह्याची कल्पना लोकांना यायला लागली होती. जशीजशी कल्पनायायला लागली, त्यांच्या एक्सपर्टनां आधी कल्पना आली, की, याच्या विरुद्ध जनजागरण जर झालं तर काय काय प्रचार करण्यात येईल. म्हणून त्यांनी खोटा प्रचार करायला

सुरुवात केली. आधीपासून भूमिका तयार करायला सुरुवात केली. आमच्या इथे जे. डी. बिर्लासारख्यांनी सोळा वर्षांपूर्वी एक लेख लिहिला होता. त्यांनी त्यात अस म्हटलं होत की, फॉर दि पर्पझेस ऑफ डोमेस्टिक मार्केट इंडिया इज ए वर्ल्ड इन इटसेल्फ. डोमेस्टीक मार्केट करता आम्ही स्वयंपूर्ण आहोत. आमच्या इथे प्रोड्यूसर्स आहेत, कंझ्यूमर्स आहेत, नॅचरल रिसोर्सेस आहेत, टॅलेंटस् आहेत. प्रिझ्युमिंग आणि बाकीच्या जगापासून कटलो तरी आम्ही आमचं मार्केट सांभाळू शकतो. यांनी उलटा प्रचार सुरू केला. तुम्ही जगापासून कटले तर तुमचं काय होईल ? जगापासून कटले तर काय होईल ह्याचा विचार आहे का ? चायना गॅटमध्ये नव्हता, त्याचं काय नुकसान झालं ? चायना गॅटमध्ये नव्हता तरी, त्याचा एक्सपोर्ट आमच्यापेक्षा जास्त होता. त्याचं फॉरेन् डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट आमच्यापेक्षा जास्त होती. आणि पुन्हा मोस्ट फेव्हर्ड नेशन स्टेटस त्याला देण्यात आलेली होती.

आता त्यांनी आपल्या ह्याच्या करता केलयं की, तो .... चायना इज स्पीकींग फ्रॉम द पोझिशन ऑफ स्ट्रेंग्थ. मनमोहनसिंगही म्हणतात, की चायना इज् स्पीकींग फ्रॉम द पोझिशन ऑफ स्ट्रेंग्थ. चायना नव्हता यांच्यामध्ये तर काय याचं नुकसान झालं ? तर अस आहे की, तुम्ही जर या सगळ्या गोष्टीला बळी न झाले तर तुमचं काय होईल ? वास्तविक आम्ही स्वावलंबी होऊ शकतो इतकी आमची स्थिती आहे. दुसरं आहे. या विषयीची जशी जशी तृतीय विश्वाच्या देशांना जाणीव झाली तस तसं महातीरमहंमदच्या इनिशिएटीव्हवर एक कमिशन बसविण्यात आलं. त्याच्यामध्ये तांझानियाचे भूतपूर्व मुख्य नेरेरे हे अध्यक्ष आणि डॉ. मनमोहन सिंग हे सेक्रेटरी जनरल, हे या कमिशनचे पदाधिकारी होते. या कमिशनचा रिपोर्ट पब्लिश झाला आहे. 'चॅलेंज टू दि साऊथ' या नावाखाली ह्या कमिशनने बारकाईनं अध्ययन करून असं स्पष्ट मत दिलं की, दक्षिणेकडचे देश सगळे एकत्र येऊन आत्ताच जर उत्तरेकडील देशांचा प्रतिकार न केला तर आपलं स्वातंत्र्य आणि संप्रभुता म्हणजे सॉव्हेरेण्टी नष्ट होईल. आणि त्या दृष्टीनी खालच्या आपल्या लोकांनी, तृतीय विश्वाच्या लोकांनी, परस्पर सहकार्य करायला पाहिजे. ते कसं सहकार्य करतां येईल याविषयीच्या योजना त्यांत देण्यांत आल्या होत्या. आणि त्यामध्ये

ठासून सांगण्यात आलं, की, तृतीय विश्वाच्या देशांनी गोऱ्या लोकांच्या या साम्राज्यशाहीला आळा घातलाच पाहिजे. त्याकरिता परस्पर सहकार्य केलं पाहिजे. आणि हा डॉक्युमेंट डॉ. मनमोहनसिंगांच्या गाईडन्सखाली तयार झालेला आहे. ही वॉज् सेक्रेटरी - जनरल ऑफ दि कमिशन. फायनान्स मिनिस्टर झाल्याबरोबर ओव्हरनाईट या सगळ्या आपल्या विचाराचं विस्मरण डॉ. मनमोहनसिंगाना झालं हे आश्चर्य आहे. ॲम्नेशिया हा एक रोग आहे. कदाचित त्यांना झाला असेल. पण त्यांनी फायनान्स मिनिस्टर होण्यापूर्वी जे म्हटलं होतं ते सगळच्या सगळं ते विसले. पण हा जर मार्ग घेतला तर आपण उत्तरेच्या देशांच्या दादागिरीला आळा घालू शकतो असं या रिपोर्टमध्ये म्हटलंय, जो रिपोर्ट मनमोहनसिंगाच्या नेतृत्वाखाली तयार झालेला आहे.

हे जे म्हणतात, दुसरं अल्टरनेटीव्ह नव्हता ही पण खोटी गोष्टी आहे. आपल्या देशाला जर आपण ठरवलं असतं वर आणायचं तर कितीतरी मार्ग होते. अनेकांनी हे मार्ग सुचविलेले होते. या सगळ्या डीटेल्समध्ये जाण्याची आपल्या लोकांची हिंमत होती का ? आमच्या सरकारची, हा एक प्रश्न आहे. तेव्हा देअर वॉज् नो अल्टरनेटीव्ह हा जो प्रचार आधीपासून सुरु झाला तो याच्यासाठी सुरु झालेला होता की, लोक जेव्हा जागृत होतील तेव्हा, त्यांना, आधीपासूनच त्यांची मनं कंडिशण्ड करून ठेवायची होती. पण सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट ही आहे, आणि मला आधीं कल्पना नव्हती, बाहेरच्या काही देशाच्या लोकांशी जेव्हा माझं बोलणं झालं, त्यांनी सांगितलं, आणि मला वाटतं भारताच्या बाबतीत ते लागू आहे. त्यांचं म्हणणं आहे की, अमेरिकेला आपलं हे साम्राज्य आणायचं आहे हे ठरलं. ह्या तृतीय विश्वातल्या देशांच्या लोकांचं शोषण करायचं हे ठरलं. पण कोणत्या स्वतंत्र देशाचं सरकार आपल्या देशातील लोकांचं शोषण करण्याची परवानगी कोणाला देईल ? म्हणून या सर्व तृतीय विश्वाच्या देशांच्यामध्ये आपल्या बगलबच्च्यांना सरकारमध्ये आणायचं हे अमेरिकेनं ठरविलं. ज्या ठिकाणी आपले बगलबच्चे सरकारी नसतील त्या ठिकाणी जे दुसरे लोक असतील त्यांना कोणत्याही पद्धतीनी, खून-खराबी करुनसुद्धा त्यांना नष्ट करायचं व आपल्या लोकांना तिथं राज्यकर्ते म्हणून आणायचं. तर आपलेच लोक या देशांचे राज्यकर्ते व आपण व

यांच्यामध्ये डीलींग, आर्थिक, व्हायचे, सामान्य जनतेला अंधारात ठेवायचं - वुईथ ए प्लॅन, डेलिबरेटली - सामान्य जनतेला अंधारात ठेवायचं. म्हणजे जेव्हा एकदम काही घटना होईल, त्यावेळेला लोक एकदम आकाशाची कुऱ्हाड पडली असं म्हणतील, भांबावून जातील, काय करायचं हे करणार नाही. मी जेव्हा 'अमेरिका' असं म्हणतो त्या वेळेला, अमेरिकेचे राज्यकर्ते आणि अमेरिकेचे मोनापली कॅपिटॅलिस्ट हा माझ्या 'अमेरिका' या शब्दाचा अर्थ आहे. हे कृपा करून ध्यानांत घ्या. आणि ह्या दृष्टीनं जर पहाल तर या लोकांनी सगळ्या जगामध्ये काय दानवी थैमान चालविले आहे याचा आपण विचार करा. सगळ्यांना अंधारात ठेवून. आपल्याला आश्चर्य वाटेल.

आम्ही तृतीय विश्वातले लोक बॅकवर्ड, पण युरोपियन कम्युनिटी, ज्यांत बारा देश येतात, तिथल्याही राज्यकर्त्यांवर प्रभाव टाकून, किसानांच्या विषयी, शेतकऱ्यांच्याविषयी जेव्हा ॲग्रीमेंट झाल आणि याची पद्धती काय आहे, की जेव्हा ॲग्रिमेंट होतं तेव्हा वर्तमानमत्रात देतात. ते काहीतरी व्हेग ॲण्ड अँबिग्युअस, गोलमाल असतं. त्यावरुन काही फारसा बोध होत नाही. वर्तमानपत्राचा उपयोग लोकांना लीड करण्याच्या ऐवजी मिसलीड करण्याकरता होतो असा युरोपच्या लोकांचा तरी अनुभव याबाबतीत आलेला आहे. तेव्हा काही तरी व्हेग अँड अँबिग्युअस असं काहीतरी देतात. गुडी गुडी टॉक. तेव्हा या बारा देशांनी ज्यावर हस्ताक्षर केलं, वर्तमानपत्रावरुन लोकांना काही त्याचा बोध झाला नाही. अमंलबजावणी सुरु झाल्यावर मग आंच बसायला सुरुवात झाली. आणि सगळ्यांत जास्त शेतकऱ्यांची संख्या आहे फ्रान्स मध्ये. दहा पर्सेंट आहे. त्यांनी आपल्या सारखं, आपण भारत बंद करतो, तसं फ्रान्स बंद सारखं केलं. रास्ता रोको, रेल्वे बंद वगैरे आणि त्यांना फ्रान्सच्या सरकारने आतून सहाय्यता केली या चळवळीला. हेतु हा की, अमेरिकेशी बोलणी करताना, फ्रान्सच्या सरकारचे हात मजबूत व्हावे. आणि त्यानी मागणी जी केली ती जगातल्या इतिहासातील अभूतपूर्व मागणी आहे. यावेळेला आपल्या सरकार समोर मागणी केली, की, तुम्ही जे हस्ताक्षर, तुम्ही जी सिग्नेचर तिथे केली आहे ती परत घ्या. तुम्ही जगाच्या इतिहासात ही मागणी कधी वाचलेली आहे ? की, सरकारने अधिकृत सिग्नेचर केलेली आहे. आणि ही सिग्नेचर

वापस घ्या म्हणून लोक आंदोलन करत आहेत. त्यांचं पाहून मग इतर देशांतील शेतकऱ्यांची संख्या कमी असली तरी शेतकऱ्यांनी थोड्याबहुत प्रमाणात आपलं आंदोलन तिथे चालविलेलं आहे.

त्यांनी 'नॉर्थ अमेरिकन फ्री ट्रेड ॲग्रीमेंट' केलं. नॅफ्टा म्हणतात. मेक्सिको, कॅनडा, युनायटेड स्टेटस्. जेव्हा झाल तेव्हा वर्तमानपत्रात असाच काहीतरी मिसलीडींग गुडी गुडी टॉक आल. कोणी काही त्याला विरोध केला नाही. परंतु अंमलबजावणीला सुरुवात झाल्यावर सर्वात प्रथम अमेरिकेतल्या मजुरांना आणि गरीब लोकांना कल्पना आली की, हा तर अमानुष करार आहे. हा व्हायला नको होता. आपलं त्यामुळे नुकसान होतं आहे, म्हणून त्यांनी चळवळ सुरू केली, अमेरिकेतल्या गरीब लोकांनी आणि मजुरांनी चळवळ सुरु केली. कॅनडामधल्या सर्व लोकांनी चळवळ सुरु केली. मेक्सिकोमध्ये चळवळ सुरु झाली. कॅनडामध्ये तर गेल्या इलेक्शनमध्ये, जे मला वाटतं आता काही महिन्यापूर्वी झालं. ज्या रुलींग पार्टीने या 'नॅफ्टा'वर सिग्नेचर केलेली आहे, त्या रुलींग पार्टीला लोकांनी पॉवर ऑफ़ सीमधून हाकललं! केवळ दोन मेंबर पार्लमेंटमध्ये त्यांचे निवडून येऊ शकले. ज्यांनी या 'नॅफ्टा'ला विरोध केला ते बहुमताने निवडून आले. आणि निवडून आल्यानंतर नवीन प्राईम-मिनिस्टरनी जी पहिली मागणी केली, क्लिंटनला जे पत्र लिहिलं, तेही जगातल्या इतिहासातलं दि फर्स्ट ऑफ इटस् टाईप असं हे पत्र आहे. त्या पत्रात त्यांनी असं म्हटलंय की, सिव्हीलाईज्ड गर्व्हर्नमेंटच्या कन्व्हेंन्शन्स आम्ही जाणतो. डेमोक्रसीमध्ये चेंज ऑफ पार्टी जरी झाला तरी जुन्यापार्टीचे जे ॲग्रिमेंटस् असतील, पॉलीसीज् असतील, प्रिन्सिपल ऑफ कंटिन्युटी ही सिव्हीलाईज्ड गर्व्हर्नमेंटची आम्ही मानतो. तरी पण हा जो ॲग्रिमेंट आहे, हा आमच्या देशाला इतका घातक आहे की, वुई डिमांड री-निगोशिएशन ऑफ दि ॲग्रिमेंट ! मला तुम्ही जगाच्या इतिहासात एक उदाहरण असं दाखवा, की जिथं निवडून आलेल्या सरकारने री-निगोशिएशन्सची मागणी केली आहे. वुई डिमांड री-निगोशिएशन्स, असं त्यांनी म्हटलेलं आहे.

मेक्सिको तर बॅकवर्ड कंट्री आहे. सरळ तिथल्या शेतकऱ्यांनी शस्त्र हातात घेतलं, बंड केलं, सात-आठ शहरं काबीज केली. सैन्यांनी त्यांना दडपून टाकलं. परंतु सशस्त्र बंड तिथं झालं. तेव्हा अंधारात ठेवायचं लोकांना.

अमंलबजावणी सुरू झाल्यानंतर लोकांच्यामध्ये काहीतरी जागृती येते. जाणून-बुजून हा एक कट आहे. आणि कुणाचा कट आहे ? तर अमेरिकेनी ज्यांना राज्यकर्ते म्हणून आणलेलं आहे किंवा कुणाला राह्यला मदत केलेली आहे असे राज्यकर्ते, अमेरिका आणि बाकी डेव्हलप्ड कंट्रीज् यांचा हा कट आहे हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे. हँड्स ऑफ फॉरीन कॅपिटल आर व्हेरी लाँग. मच लाँगर दॅन व्हॉट यू ऑफ आय कॅन इमॅजिन. आधीपासून प्रोपॅगंड्यांची तयारी सुरु केला खोट्या गोष्टी सांगत आले !

आतां पहा, सगळ्यांची ही कल्पना आहे की, कर्ज आहे, व्याज आहे, द्यावं लागतं हे ठीक आहे. पण बिचारे गोरे देश जी रक्कम आम्हाला एड म्हणून देतात, ती तर परत करायची नसते. त्याच्यावर इंटरेस्ट द्यायचं नसतं. तेव्हा किती उदार लोक आहेत. राजा कर्णानंतर इकी उदारता आपल्याला जगाच्या इतिहासात प्रथमच पहायला मिळाली. फार उदार लोक आहेत. असं आपल्याला वाटतं. वर्तमानपत्रं अर्धसत्य पब्लिश करतात. त्यांची ती जबाबदारी नाही. वर्तमानपत्रांची जबाबदारी आपला खप वाढवावा हीच प्रमुखत: असते. जनतेला एज्युकेट करणं ही काही पहिली जिम्मेदारी नाही. जातां, जाता जनता एज्युकेट झाली तर दे कॉंट हेल्प इट ! तेव्हा त्या पद्धतीनी, वर्तमानपत्रात आलं. मला लास्ट फिगर्स १९९१ च्या आठवतात. ९१ च्या फिगर्स अशा आहेत. त्या वर्षी, डेव्हलप्ड कंट्रीजनी, डेव्हलपिंग कंट्रीजला फॉर्टी नाईन (४९) बिलियन डॉलर्सची एड दिली. ४९ बिलियन डॉलर्स. मोठा आंकडा आहे. त्याबद्दल त्यांच अभिनंदनही झालं. हे तर सांगितलं. पण हे सांगितलं नाही की, त्याच वर्षी सायमल्टेनिअसली इंटरेस्ट आणि प्रॉफिट रिपॅट्रिएशन म्हणून (१४७) वन फॉर्टीसेव्हन बिलियन डॉलर्स डेव्हलपिंग कंट्रीजकडून डेव्हलप्ड कंट्रीकडे गेले. हे सांगितले नाही ! दोघांचा जर हिशेब केला तर १४७-४९ तर ९८ नाईण्टीएट् बिलियन डॉलर्स पैशाचा प्रवाह डेव्हलपिंगकडून डेव्हलप्ड कंट्रीजकडे गेला ! पण अर्धसत्य सांगणारी वर्तमानपत्रं वाचून हा बोध कोणाचा व्हायचा नाही. गल्फ-वॉरच्या वेळेला, सद्दाम हुसेनच्या, एक बातमी पब्लिश झाली, ज्याबद्दल इजिप्शियन सरकारचं सगळ्यांनी अभिनंदन केलं, की, दे वेअर सक्सेसफुल इन् गेटींग डेट ऑफ

११३ बिलियन डॉलर्स रिटन ऑफ. इजिप्तवर जे ११३ बिलियन डॉलर्सच कर्ज होतं होतं ते राईट ऑफ करण्यामध्ये सरकारला यश आलं. सगळ्यांनी त्यांचं अभिनंदन केलं. हे लोकांच्या डोळ्यासमोर वर्तमानपत्रांनी आणलं नाही की, सामयल्टेनिअस्ली काय झालेलं आहे ? सद्दाम हुसेन बरोबर अमेरिकेला लढाई करायची होती. सगळी अरब राष्ट्रं कदाचित अरब नॅशनॅलिझम म्हणून एकत्र येतील अशी संभावना होती. त्यामुळे काही अरब राष्ट्रांना फोडण्याची आवश्यकता होती. सौदी अरेबिया आणि इजिप्त यांना फोडण्याची आवश्यकता होती. ११३ बिलियन डॉलर्सचं हे जे कर्ज आहे, हे कर्ज राईट ऑफ होण्याची प्रक्रिया आणि गल्फ-वॉरची प्रक्रिया आणि त्या गल्फ वॉरच्या वेळेला अमेरिकेनं जी को-ऑपरेशन आर्मी उभी केली होती, त्या को-ऑपरेशन आर्मीमध्ये इजिप्तला आपली सेना पाठवावी लागली या दोन गोष्टींमध्ये काही बिंग आहे, को-रिलेशन आहे हे सांगण्याची जबाबदारी वर्तमानपत्राची नाही. ती बातमी अलग पब्लिश झाली. अंगोला म्हणून जो देश आहे त्या ठिकाणी ही बातमी पब्लिश झाली की, फ्रान्स सरकारसुद्धा फार उदार आहे. अंगोलन् सरकाला एक मोठं ऋण फ्रान्सच्या मध्यस्तीमुळे, गुड ऑफिसस्, हा शब्द आहे. प्रशस्त शब्द आहे. फ्रान्सच्या गुड ऑफिसेसमुळे, एक मोठं लोन त्यांना प्राप्त झालं. पण हे प्रसिद्ध झालं नाही, की, त्याच्या आधी एक फ्रेंच ऑईल कंपनी अंगोल्यामध्ये ऑपरेट करीत होती. त्यांच्या ते ध्यानात आलं की, इथे ऑईल फिल्डस् पुष्कळ आहेत. त्या सर्व ऑईल-फिल्डस्ची मोनॉपली त्यांनी मागितली. ती मोनॉपली त्यांना मिळाली, आणि इकडे फ्रान्स सरकारने आपल्या गुड् ऑफिसनं लोन दिलं. या दोन गोष्टामधलं को-रिलेशन सांगण्याची जबाबदारी वर्तमानपत्राची नाही. हा अर्धसत्याचा नमुना आहे. एकदा सरळ खोटं बोललेलं चाललं. हे खोटं बोलतातच, साम्राज्यवादी लोक. गोबेल्ससचं जे तत्त्व होतं, की, रिपीट ए लाय हंड्रेड टाईम्स अँड इट् बिकम्स द ट्रूथ ! आणि हिटलर तर त्याही पुढे एक पाऊल जाऊन म्हणत होता की, खोटंच बोलायचं. तर डोण्ट गीव्ह ए सिंपल लाय ! गिव्ह ए बिग बल्क ! ! तो इतका बिग असला पाहिजे की, तो खोटा असू शकतो हे कोणाला खर वाटणारच नाही. तेव्हा या परंपरेतले

तर हे लोक आहेतच. पण अर्धसत्य, हाफट्रूथ ईज मोअर डेंजरस दॅन ए सिंपल - डायरेक्ट लाय - असं आपल्या लक्षात येईल. तर प्रोपेगंडानी त्यांची ही सगळी भूमिका तयार केली असं, आम्ही स्वदेशीवाल्यांशी म्हटलं.

इन्व्हेस्टमेंटविषयी आम्ही काही म्हटलं. आधीपासून प्रचार झाला होता. हे स्वदेशीवाले, नोकरीवाले, चड्डीवाले यांना काही कळतं का अर्थशास्त्र काय आहे ? म्हणजे ठेका यांनीच घेतलेला आहे बुद्धिमत्तेचा. असे इन्व्हेस्टमेंटशिवाय कुंठं काही चालतं का ? फॉरेन इन्व्हेस्टमेंटशिवाय कसं चालेल ? ही काहीतरी नवीन मुलं आलेली आहेत त्यांना काय कळतं ? आम्ही इन्व्हेस्टमेंटचा विरोध केलेला नाही. पण फॉरेन इन्व्हेस्टमेंट जी ॲडव्हान्स कण्ट्रीज मध्ये येते त्याकडे त्यांचे लक्ष आम्ही वेधलेले आहे. ॲडव्हान्स कंट्रीमध्ये फॉरेन इन्व्हेस्टमेंट आहे. आम्ही मान्य करतो. पण ती कशी आहे ? इट् इज ऑन दि टर्म्स ऑफ दि कंट्री. हे ठीक आहे की, निगोशीएशन्स होतात निगोशिएशन्स याचा अर्थच असा आहे की, वाटाघाटी. दोन गोष्टी तुम्ही सोडता दोन गोष्टी आम्ही सोडतो. निगोशिएशन्स ऑन इक्वल फूटींग आणि त्यामधून प्रत्येक राष्ट्र आपल्या नॅशनल सेल्फ इंटरेस्टचं संरक्षण करून, ऑन इक्वल फूटींग निगोशिएशन करून, ऑन दि टर्म्स ऑफ दि होस्ट कंट्री ही इन्व्हेस्टमेंट झालेली आहे. आमच्या इथली इन्व्हेस्टमेंट तशी नाही. आमच्या इथली इन्व्हेस्टमेंट अशी आहे की, कंप्लीट सेल्फ सेंटर्ड, जसं कोणी म्हणतात की, पिक्चरमध्ये सरेंडर करायचं म्हणजे डाकूलोकसुद्धा असे हात वर करतात, असं मी एकेलं, असे हात वर करून आमच्या ब्यूरोक्रॅट्सनी ही ॲग्रिमेंटस् केलेली आहेत. इथे एक कारखाना आहे. बारा मैलावर त्याचा कच्चा माल सापडतो. तो घेण्याचा आम्हाला स्वातंत्र्य नाही. कोलॅबरेटींग कंट्री असेल तो किंवा त्याच्या मित्रदेशाकडून मटेरियल आणावं लागेल. स्पेअर पोर्टस् आमचे साधे लोक बनवू शकतात, ते तिथून आणावे लागतील. रिपेअरिंग करायची असेल तर त्यांची आर्मी ऑफ इंजिनिअर्स आणावी लागतील. एक्सपोर्ट क्वालीटी काय असावी हे ते लोक निश्चित करतील. अशा प्रकारची लज्जास्पद, ह्युमिलिएटींग ॲग्रिमेंट हे कोणत्याही ॲडव्हान्स कंट्रीमध्ये झालेली नाहीत, हे सांगत नाहीत. एवढंच सांगतात की, तिथं इन्व्हेस्टमेंट होते. इथे ही इन्व्हेस्टमेंट करायला हे चड्डीवाले विरोध करून राहिलेले आहेत.

टेक्नॉलॉजीविषयी सांगतात. यांना काय कळत ? एवढंच सांगितलं की, हिंदूस्थानला पंधराव्या शतकामध्ये ओढून नेऊ इच्छितात. आम्ही प्रगतीशील आहोत. आम्हाला एकविसाव्या शतकामध्ये जायचेआहे. एका आमच्या पंतप्रधानांनी म्हटल होतं भारतातल्या लोकांना आश्वासन दिल की मी तुमची एकविसाव्या शतकाची गाठ घालून देतो. जसे काही ते नसले की आता आमची एकविसाव्या शतकाची गाठच पडणार नाही. आणि खरं म्हटलं म्हणजे एका हिंदू कॅलेंडरला आनुसरुन आम्ही आधीच एकविसाव्या शतकात गेलो आहोत. पण हिंदू कॅलेंडर माहिती असाव सुशिक्षित लोकांना ही काही अपेक्षाच नाही! या पंतप्रधानाला विशेष माहितीही पश्चिमेचीच होती. युरोपची होती. त्यातही विशेषज्ञ ते इटलीचे होते. तेव्हा हिंदुस्थानच्या कॅलेंडर विषयी त्यांना माहिती नव्हती यात काही आश्चर्य नाही. पण आम्हाला सांगण्यात येत की एकविसाव्या शतकाचा मुकाबला करायचा. कसा करणार ? तुम्हाला टेक्नोलॉजिविषयी काही माहिती आहे का ? ए.बी.सी.डी. ? काय तिथे पाश्चिमात्यांमध्ये टेक्नोलॉजिविषयी कल्पना आहे ? आज अशी स्थिती आहे तुम्हाला कोणीही अप-टु-डेट टेक्नॉलॉजी द्यायला तयार नाही. ते मूर्ख आहेत का की आपली अप-टु-डेट टेक्नॉलॉजी तुम्हाला देतील ? तिथं सारखं टेक्नॉलॉजिकल ॲडव्हान्स चालु आहे. पण इन् दि प्रोसेस ऑफ टेक्नॉलॉजीकल ॲडव्हान्स पहिल्या मशिनरी तेव्हा ॲबसॉलिट होतात तेव्हा त्यांच्या पुढे प्रश्न असतो त्यांना कुठ ठेवायचं ? इन्व्हेंटरीमध्ये काय करणार ? दे वॉण्ट टु डिस्पोज ऑफ दे आर डंपींग ऑफ देअर ॲबसॉलिट मशिनरी ऑन् थर्ड वर्ल्ड कन्ट्रीज हा त्यांचा प्रकार आहे. टेक्नॉलॉजिविषयी तिथे सुद्धा पुनर्विचार सुरु झालेला आहे. आणि तिथले सायन्टिस्ट आणि टेक्नॉलॉजिस्ट अशा प्रकारचा प्रोग्रेस झाला तर एकंदरीत मनुष्य जातीला उपकारक होईल की नाही ? आणि म्हणून टेक्नॉलॉजिकल ओंबडस्मन असला पाहिजे. अशा प्रकारचा विचार तिथे सायन्टिस्ट ॲण्ड टेक्नॉलॉजिस्ट करायला लागलेत. त्यांनी असं म्हटलंय की ओंबडसमन् म्हणजे नियंत्रक संस्था. टेक्नॉलॉजिची प्रगती कोणत्या दिशेने व्हावी याच नियंत्रण करणारी संस्था असावी. इंटरनॅशनल टेक्नॉलॉजिकल ओंबडसमन् आंतरराष्ट्रीय नियंत्रक संस्था टॅक्नॉलॉजिची ही डिमांड आमच्या

सारख्या चड्डीवाल्यांकडून नव्हे तर तिथल्या सायन्टीस्ट ऑफ टेक्नॉलॉजीस्ट कडून यायला लागलीय आणि आमच्याकडले प्रोग्रेसिव्ह सांगतात की सगळी टेक्नॉलॉजी तिकडची इकडे आणा. आमची भूमिका आम्ही घेतलीच आहे. की आमच्या टेक्नॉलॉजिस्टनी सागळ्या दुनियेतल्या टेक्नॉलॉजिचा अभ्यास करावा. आणि त्यावरून नॅशनल टेक्नॉलॉजी पॉलिसी निश्चित करावी. त्यात चार गोष्टी निश्चित कराव्यात. पहिली गोष्ट - की फॉरेन टेक्नॉलॉजि मधले कोणते पोर्शन्स असे आहेत की जे ॲडॉप्ट करायचे आहेत. जसेच्या तसे ॲडॉप्ट याचा अर्थ की जसेच्या तसे उचलून आणायचे. हे आमच्या देशाला उपयुक्त असे असतील. दुसरं कोणते पोर्शन्स ऑफ टेक्नॉलॉजी असे आहेत की जे वुईथ मॉडिफिकेशन काही हेरफेर करून म्हणजे जे ॲडॅप्ट करण्यासारखे आहेत. तिसरं - कोणते पोर्शन्स असे आहेत की, जे रिजेक्ट करण्यासारखे आहेत आणि चौथे - कोणते पोर्शन्स असे आहेत की, ज्या विषयाची टेक्नॉलॉजी तिथे असणच शक्य नाही. कारण आवश्यकता नाही, आमच्या परिस्थितीला अनुसरुन आम्हालाच ती इव्हॉल्व करावी लागेल. तेव्हा कोणती इव्हॉल्व्ह करायची, कोणती रीजेक्ट करायची, आणि कोणती ॲडॉप्ट करायची याची सुसूत्र नॅशनल टेक्नॉलॉजिकल पॉलिसी बनवा. त्याच्यामध्ये सगळ्या इण्डस्ट्रीजना बसवा. असं आमचं म्हणणं आहे. हे काहीही करायला सरकार तयार नाही. त्याचं कारण असं आहे, परदेशियांच्या दबावाखाली त्यांना त्यांची टेक्नॉलॉजी इथं आमच्या देशावर दडपून आणायचीय. तेव्हा आपल्या लोकांच्या विषयीचा गैरसमज पसरविण्याचं काम हे फार आधीपासून सुरू झालेलं आहे. हा जो त्यांचा खोटा प्रचार आहे, हा इतका मोठ्या प्रमाणावर आहे, की, वेलमेंट पॅट्रियटसुद्धा त्या प्रचाराला बळी पडतात असं मी पाहिलेले आहे.

आता या डंकेलविषयीचे पहा. हा एक मोठा डॉक्यूमेंट आहे. या डॉक्युमेंटमध्ये काय याच्याविषयी मी आपणाला सांगितले. मी चॅलेंज देऊन सांगतो कुणीही शास्त्रार्थाकरिता आम्हाला पुण्याला बोलवावं, आम्हाला दहा तास द्यावेत, आम्ही चर्चा करायला तयार आहोत. आम्ही स्वीकार करायला तयार आहोत चॅलेंज! पण आधीपासून खोट्या प्रचारांने भूमिका कशी तयार

होते पहा. नागपूरला मी इंटेलेक्च्युअल्सची बैठक घेत होतो.मला वाटतं इंटेलेक्च्युअल नावाची नवीन जात हळहळू तयार होते आहे. तेव्हा काही इंटेलेक्च्युअल्सनी आम्हाला प्रश्न केला. म्हणाले की, 'तुम्ही एक ऐकलय का ? तुम्ही अनैतिकतेचे समर्थक आहात. म्हटलं का ? अहो म्हणे, असं आहे, की, आमच्या पुढाऱ्यांनी आम्हाला सांगतलं की, आमचे वैज्ञानिक चोर आहेत. हे म्हणजे त्यांनी वैज्ञानिकांच्या सभेत सांगितलेलं आहे, म्हटलं हिंमतीचा मनुष्य आहे ! की, आमचे वैज्ञानिक चोर आहेत. बिचारे विदेशातले ञानिक खूप मेहेनत करतात. पैसे खर्च करतात, नवीन शोध लावतात. आमचेवैज्ञानिक तिथे जाऊन आयते ते शोध चोरुन आणतात आणि त्यांच्या भरंवशावर इथे स्वत:ची भरभराट करतात. ही जी अनैतिक वर्तणूक आहे, त्याचं तुम्ही समर्थन करतां. काय तुम्हाला असं वाटत नाही, की, डंकेलने जे म्हटलेलं आहे की, या अनैतिक वर्तणुकीबद्दल यांना शिक्षा व्हायला पाहिजे. आणि आमचे पुढारीही म्हणताहेत, की, यांना शिक्षा व्हायला पाहिजे. तुम्ही हे मान्य करता की अमान्य करता ? मी त्यांना म्हटलं की, मी बुवा लहान मनुष्य आहे. त्यानी चोरी केली की नाही हे मला माहिती नाही तुम्हालाही माहीत नाही आणि मी तुम्हाला आश्वासन देतो की, तुमच्या पुढाऱ्यालाही माहिती नाही. कुणालाच माहिती नाही परंतु मानलं फॉर द सेक ऑफ ऑरग्यूमेंट की, आमच्या वैज्ञानिकांनी चोरी केलेली आहे. मग त्यांना शिक्षा द्यायची की नाहा? द्यावी. किती द्यावी ? फाशीची शिक्षा द्यावी. (आमची ?) त्याला काही हरकत नाही. नैतिकतेला धरून राहील. फाशीची शिक्षा द्या. प्रश्न आमचा पुढचा आहे. की, त्यांनी नैतिकता अनैतिकता केलीय की नाही हे ठरविण्याचा अधिकार, त्यांना शिक्षा किती द्यावी हे ठरविण्याचा अधिकार. फाशीची शिक्षा द्यावी हे ठरलं जर असेल, तर फाशीची शिक्षा देण्याचा अधिकार हा भारतातील एखाद्या एजन्सीला आणि शक्तीला असावा की, भारताबाहेरील एखाद्या एजन्सीला आणि शक्तीला असावा हा प्रश्न आहे. आमचं म्हणणं आहे की, या सगळ्यांना फाशी देण्याचं तुम्ही ठरवा. लेट सुप्रीम कोर्ट डिसाईड्. आमच्या देशाचं सुप्रीम कोर्ट. आमच्या देशाचे राष्ट्रपती, आमच्या देशाचे प्रधानमंत्री यांना हा अधिकार असावा. भारतबाह्य डंकेलला हा अधिकार

असू नये. गॅटला अधिकार असू नये. फाशी द्यावी की, नाही हा नाही इथे प्रश्न नाही. प्रश्न आमच्या साव्हरेंटीचा आहे. हू आर दे टु इंटरफिअर ? खोमेनीने जेव्हा असं म्हटलं की ह्या व्हर्सेस्‌बद्दल याला हे करा, आम्ही त्याचा खून करणार आहोत. सगळ्यांनी असं म्हटलं की, तुला आमच्या देशात येऊन खून करण्याचा अधिकार नाही. आमच्या सॉव्हरेंटीवर आक्रमण आहे. हे आमच्या साव्हरेंटीवर आक्रमण नाही ? तो प्रश्नकर्ता मला यावर असं म्हणाला की, हा दृष्टिकोन आमच्या समोरच आला नव्हता. आम्ही त्या नैतिक-अनैतिकतेच्या प्रश्नामध्ये गुंतलो होतो.

दुसरं आम्हाला त्या ठिकाणी विचारण्यात आलं, काहो म्हणाले, त्यांनी किसानांचा, शेतकऱ्यांचा भरपूर फायदा होणार आहे हे तुम्हाला मान्य आहे का ? म्हटलं मला हे काही लक्षात आलेलं नाही. मी डॉक्यूमेंट वाचलेला आहे. मला इंग्लिश येतं. हा जो आमच्यावर आरोप आहे, आम्हाला इंग्लीश येत नाही, लीगल इंग्लीश तर मुळीच येत नाही आणि डॉक्यूमेंट वाचता येत नाही हा काही खरा नाही आहे. तर म्हटल मी वाचलेला आहे डॉक्यूमेंट. काही यामध्ये फायदा नाही. म्हणाले, किसानांची निर्यात वाढणार आहे. आणि निर्यात वाढल्यामुळे मग त्यांना लाभ होणार आहे. म्हटलं पहिली गोष्ट ही की, निर्यात वाढणार आहे, पण त्याच्याबरोबर तुम्ही जिथे निर्यात करणार त्या देशांच्यावर काही रिस्ट्रीक्शन आहे का की, त्यांनी आयातीवर काही बंधने घालू नयेत. पंधरा ते वीस पर्सेंट अशा प्रकारचे युरोपमध्ये आणि काही शे पर्सेंट अशा प्रकारचे जपानमध्ये बाहेरुन येणाऱ्या अन्नधान्यावर अशा ड्यूटीज आहेत. त्या सरकारांनीच ड्यूटीज घालू नये अशा प्रकारची कोणतीही व्यवस्था गॅटमध्ये नाही आहे. आम्ही निर्यात केली, ते आयात करू देतील का ? हा प्रश्न आहे. पण त्याहीपेक्षा दुसरा महत्त्वाचा प्रश्न आहे आज जी आपली स्थिती आहे. सत्तरपर्सेंट आमचे शेतकरी गरीब आहेत. किती गरीब आहेत ? ज्यावेळेला पीक येतं, त्यावेळेला त्यांना ते ताबडतोब बाजारात नेऊन विकावं लागतं. त्याची दोन कारण आहेत. एक साधारण किसान, ७० पर्सेंट किसान हा गरीब आहे, आणि याला वाट पहाण्याची शक्ती नाही. स्टेईंग कपॅसिटी नाही. पण अधिक महत्त्वाचं कारण हे आहे की, स्टेईंग कपॅसिटी केव्हा येत?

हा गरीब असला तरी अडाणी नाही आहे. त्याला हे कळतं की, तीनचार महिने जर आपण वाट पाहिली तर या अन्नधान्याची जास्त किंमत बाजारात येणार आहे. हे ठीक आहे, की, जे पेरिशेबल् गुड्स आहेत, म्हणजे भाजी आहे, फळं आहेत हे ताबडतोब नष्ट होतात. फ्रीज काही प्रत्येकाच्या घरात नाही. पण अन्नधान्यासारख्या वस्तू या जर तीन चार महिने आपण राखून ठेवल्या तर त्याला पुढं भाव जास्त येणार आहे हे त्याला कळतं. तो वाट नाही पाहू शकत याचं कारण असं आहे की, स्टोरेजची व्यवस्था त्याच्याकडे नाही आहे. आमच्या सरकारने अशी व्यवस्था केलीय की, किसानाला त्याच्या मालाच्या स्टोरेज्ची व्यवस्था करून दिलेली आहे. कुणाला दिली आहे ? जे मध्यस्थ दलाल असतात, ज्यांची सफेद धोतरं आणि पँटस् आहेत, जे कधीही शेतीवर जात नाहीत, ज्यांच्या धोतराला, पँटला जमिनीचा डाग लागलेला नाही. ज्यांनी कधी नांगराला हात लावलेल नाही. त्यांनी नॅशनल बँकेकेडून स्टोरेजसाठी पाहिजे तितका पैसा मिळावा अशी सरकारने व्यवस्था केली आहे. म्हणून जसं ते पीक येतं तसं त्याला ते ताबडतोब विकणं भाग पडतें. अंडर ड्युरेस ज्याला म्हणतात. विकावं लागतं. ते मध्यस्थ विकत घेतात, आपल्या स्टोरेज्मध्ये ठेवतात आणि जेव्हा भाव वाढेल त्यावेळेला ते विकायला काढतात ही स्थिती आहे. आता आम्हाला निर्यातीचे म्हणजे जर्मनीमध्ये, जापानमध्ये, अमेरिकामध्ये आमचा शेतकरी निर्यात करणार. तिथे निर्यात करण्याकरिता, तिथे बाजारात भाव येण्याकरिता जर समजा सहा महिने लागणार असतील तर हा तिथपर्यंत आपला माल रोखू शकतो का ? जो जवळच्या बाजारामध्ये दोन महिने पर्यंत वाट पाहू शकत नाही. तो जर्मनीच्या आणि अमेरिकेच्या बाजाराकरिता सहामहिने आठ महिने वाट पाहू शकणार आहे का ही एक गोष्ट. आणि दुसरी गोष्ट - त्याला हा माल विकावा लागणार दलालाला. तेव्हा लाभ जर व्हायचा असेल तर त्याला व्हायचा नाही. हे मध्यस्थ दलाल लाभ घेतील. आज घेताहेत आणि हे दलालसुद्धा फार काळ पूर्ण लाभ घेऊ शकणार नाहीत. ज्या ठिकाणी टॉम्को, गोदरेज आणि थम्स-अप टिकलेलं नाही त्या ठिकाणी हे दलाल टिकू शकतील ? त्यांना सब् एजंट व्हावं लागेल. कमिशन एजंट व्हावं लागेल. आणि सर्व मल्टिनॅशनल्स कडून हा सर्व व्यवहार होईल. तेव्हा आमच्या शेतमालाची निर्यात कदाचित वाढलीच तर त्याचा फायदा मल्टीनॅशनल्सना

होईल. सब-एजंट म्हणून काही कमिशन दलालांना मिळेल. शेतकरी जिथे होता तिथे राहील अशा प्रकारची वस्तुस्थिती आहे. जे पुढारी सांगातहेत, की, लाभ होणार आहे, त्यांना हे कळत नाही असं नाही. ते असं का बोलतात ते माझ्या सारख्याच्या, सामान्य माणसाच्या लक्षात येऊ शकत नाही. पण अशा प्रकारचा खोटा प्रोपॅगंडा फार मोठ्या प्रमाणावर या बाबतीमध्ये आधीपासून चाललेला आहे. मला असं वाटतं की, फार डीटेल्समध्ये जाणं शक्य नाही.

इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राईट्स् विषयी म्हणा. इन्व्हेस्टमेंटविषयी, एक स्पष्ट आहे की, जर डंकेल आला तर आम्ही पूर्णपणे बरबाद होणार आहोत. कृषि आमची राहयची नाही, शेतकरी बरबाद होणार आहे. आमचे हे छोटे उद्योग, आज बाहेरचं कुणी नाही देशामध्ये, तरी, मिल, पॉवरलुम आणि हॅंडलुम याच्यामध्ये देशातल्या देशांत सुद्धा हॅंडलुमला प्रोटेक्शन द्यावं लागते. लाईन ऑफ डिमार्केशन करावी लागते की, हॅंडलूमचं प्रॉडक्शन राहील. इतकं पॉवरलूमचं राहील, इतकं मिल्सचं राहील. मिल्सनी पॉवरलूम्सवर आणि पॉवरलूम्सची हॅंडलूम्सवर आक्रमण करू नये. एन्क्रोचमेंट करू नये म्हणून आज आपल्याला नियम बनवावे लागतात. आज जर देशातल्या देशात विणकरांना वाचविण्याकरता इतके नियम बनवावे लागतात. मग मल्टिनॅशनल्सना हे दरवाजे उघडे झाले तर हे वाचतील ? आमच्या ट्रेडिशनल्स स्किल्स आहेत, आमचे व्हिलेज आर्टिझन्स आहेत, हॅंडीक्रॅफ्टस्‌मेन आहेत हे वाचू शकतील? ज्या ठिकाणी मोठ मोठाले कॅपिटॅलिस्टस् टिकत नाहीत, आमचे जे स्मॉल स्केल इंडस्ट्रियालिस्ट आहेत, सगळे दरवाजे जर आम्ही मल्टिनॅशनल्सला ओपन केले तर हे टिकू शकतील ? अहो याची काय अवस्था आहे ! हे जे मोठे कॅपिटॅलिस्ट होते त्यांनासुद्धा आधी असा भ्रम होता की, छोटे लोक खतम होतील आम्ही तर रहाणारच आहोत. पण नंतर त्यांच्याही लक्षात आलं की, आम्ही टिकू शकणार नाही. म्हणून त्यांनीही सरकारला असं म्हणणं सुरु केलय, मोठ्या कॅपिटॅलिस्टांनी, मोनॉपॉली कॅपिटॅलिस्टांनीसुद्धा सरकारजवळ ही मागणी करायला सुरुवात केलीय, की, आमच्या संरक्षणाची काही व्यवस्था करा. तर जिथे ते मागणी करतात तिथे स्मॉल स्केल इंडस्ट्रियलिस्ट, व्हिलेज

आर्टिझन्स, आमचे हँडिक्राफ्टस्‌मन कुठे टिकणार आहेत ? आमचा उद्योग पूर्णपणे त्यांच्या हातात जाईल. आमचा रिसर्च पूर्णपणे त्यांच्या हाती जाईल. इतकं सगळं या देशाचं आरिष्ट आहे. म्हणजे त्याच्यामध्ये बेकारी किती वाढणार आहे. इन्फ्लेशन किती वाढणार आहे. भूकमारी किती वाढणार आहे याचा आपण विचार करू शकतो.

अशा प्रकारचा डॉक्यूमेंट आहे. पण या डॉक्यूमेंटची तरफदारी करणारे आहेत. आपल्या इथे असे उदार मनाचे लोक नेहमीच रहातात. आणि अशाच लोकांना इंटेलेक्च्युअल्स ॲप्रिशिएट करतात. ज्यांच्यामध्ये स्वजनांचं अहित असते असं काम करणारे लोक आपल्या इथे फार उदार मानले जातात. मला आठवतं की, चायनीज्‌ आक्रमाणानंतर जयपूर क्राँग्रेस झाली होती. तर जवाहरलाल फार लिबरल्‌ माईंडेड,प्रश्नच नाही आहे. ही वॉज्‌ ए वर्ल्ड लीडर. तर चायनीज आक्रमण होऊन गेलं होतं. जयपूरला काँग्रेस झाली. तेव्हा महावीर त्यागींनी त्यांना असं म्हटलं होतं की, अपनोंसे बैर कर लिये गैरोंसे दोसता। अपमोंसे सर कटा दिये सरदार बन गये । जवाहरलाल खाली पहात राहिले. अशा लिबरल माइंडेड लोकांना साधारण हिंदू ॲप्रिशिएट करतो. आपल्या राष्ट्रीय हिताचं संरक्षण करणारा मनुष्य जो असतो त्याला ॲप्रिशिएट करणं हिंदूंच्या स्वभावात नाही. स्वदेशी जागरण मंचाने काही भूमिका घेतली आहे. यावेळी हे ठीक आहे की, डंकेलविषयी जागरण झालेलं आहे. पार्लमेंटमध्ये या विषयी गदारोळ झालेला आहे. निरनिराळे पक्ष याला विरोध करताहेत. निरनिराळे ग्रुप्स याला विरोध कराहेत. आणि अशीही मागणी काही लोकांकडून आलेली आहे की, या सर्व लोकांना एकत्रित आणण्याचं काम व्हावं. फेब्रुवारी १९९१, फेब्रुवारी १९९२ मध्ये आमचे जस्टीस व्ही. आर. कृष्ण अय्यरशीं या विषयावर बोलणे झाले. मला ते म्हणाले बुवा तुम्ही असा काही प्रयत्न करा. मी म्हटले मी लहान मनुष्य आहे. तुम्ही पुढाकार घ्या कम्युनिस्टांशी तुमचा संबंध आहे. मी आमची काही संघदृष्टी आहे. त्या तर्फे मी तुम्हाला आश्वासन देऊ शकतो की बुवा तुम्ही सगळ्यांच्याच हिताचं कराल त्या पद्धतीने आम्ही चालायला तयार आहोत. याच्या विरुद्ध सगळ्यांनी लेफ्टीस्ट आणि आम्ही सर्व मिळून काही तरी एक मंच उभा करा असा की

तुम्ही प्रयत्न केलात तुमच्या आदेशा प्रमाणे आम्ही चालायला तयार आहोत. त्यांनी प्रयत्न केला तो जमलेला नाही आहे. तर सगळ्यांनी एक मंचावर यावं हा प्रयत्न चालू आहे. काय होईल, काय होणार नाही हे आज काही सांगता येणार नाही.

परंतु एक जागृती आलेली आहे आणि अनेक लोकांनी डेमॉन्सट्रेशन ठरवली आहेत. पांच तारखेला मला वाटतं, लेफ्टीस्ट आणि बाकीच्यांच डेमॉन्सट्रेशन आहे. ६ एप्रिल ला भारतीय जनता पार्टीचे डेमॉन्सट्रेशन आहे. आणि या ठिकाणी प्रयत्न करुन सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न होईल. की उद्या त्यांनी सही करू नये. हे अत्यंत स्तुत्य आहे. अशा प्रकारचे दबाव आणण्याचे अधिकाधिक प्रयत्न यशस्वी व्हावेत असे सर्व देशभक्तांना वाटेल यात शंका नाही.

एकच आहे पुढच्या दृष्टीने एक सूचना वॉर्निंग म्हणून आवश्यक आहे असं मला वाटतं. हे आवश्यक आहे की प्रदर्शने व्हावीत हे ही आवश्यक आहे की प्रदर्शन यशस्वी व्हावीत. मोठ्या प्रमाणावर व्हावीत. पण प्रत्येक गोष्टीचा काही फॉल आऊट असतो साईड इफेक्ट्स असतात. असं होऊ नये की आपण मोठ्या प्रमाणावर प्रदर्शने केली पुष्कळदा लोकांच्या डोक्यात एक फ्रेज बसली आहे 'नाऊ ऑर नेव्हर' फॅशनेबल फ्रेज आहे. परंतु नाऊ ऑर नेव्हर बस आता सगळ्या ताकतीच प्रदर्शन करा कारण आता नाहीतर देश पुडला असं म्हणून आपण प्रदर्शन केलीत करायला पाहिजेत स्तुत्य आहे. यशस्वी व्हावीत भगवंताला आमची प्रार्थना आहे की सगळ यशस्वी व्हावं पण याचा एक साईड ईफेक्ट जसा अँटीबायोटीक्स चा होतो काय होऊ शकतो याच्या विषयी मला म्हणायंच आहे की अस नाऊ ऑर नेव्हरच्या भाषेत लोकांना एकत्र केलं आणि सही तर व्हायची पण सही होणं हे वॉशिंग्टनवर आवलंबून आहे नवी दिल्लीवर अवलंबून नाही, तर लोकांच्या मनात ही भावना येऊ नये की, धिस् इज् ए फेट अकंल्पी. आम्ही पन्नास लाख किंवा एक करोड लोकांचं डेमॉस्ट्रेशन केलं तरी शेवटी सही तर झालीच आता काय करणार ? इट् अज् ए फेट अकंप्ली. एक विवशतेची, असहाय्यतेची, हेल्पलेसनेसची भावना लोकाच्या मनात येऊ नये. आमचं म्हणणं आहे की,

सगळी प्रदर्शनं व्हावीत ती यशस्वी व्हावीत. जेवढी त्याला स्वाभाविक रीतीने मदत करता येईल ती सर्व देशभक्त करतील. आम्ही लोक करू यात काही शंका नाही.

परंतु आमची भूमिका थोडी निराळी आहे. ती मला आपल्या समोर मांडायची आहे. मी व्यक्तिश: स्वदेशी जागरण मंच म्हणून किंवा व्यक्तिश: प्रधानमंत्र्यांना म्हणतो की तुम्ही पन्नास हजार सह्या करा त्या डॉक्युमेंटवर. पन्नास हजार सह्या करा. काही त्यामुळं फरक पडत नाही. ह्याचं कारण असं आहे की, दे डोण्ट रिप्रझेंट दि पिपल्स इन धिस रिस्पेक्ट ज्यावेळं गेलं इलेक्शन झालं होतं, त्या गेल्या इलेक्शनाच्या वेळेला लोकांनी काँग्रेस पार्टीला मॅण्डेट किंवा ॲथॉरिटी दिलेली नव्हती, की, अशा प्रकारच्या डॉक्यूमेंटवर तुम्ही सही करायची आहे. इलेक्शनमध्ये जर विषय नसेल, हा मॅण्डेट नसेल, ही ॲथॉरिटी नसेल तर तुम्हाला सही करण्याचा अधिकार येत नाही. अशावेळी काय करतात ? प्रजातांत्रिक कन्व्हेन्शन. इंग्लंडमध्ये हा एक प्रश्न उपस्थित झाला की युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटीमध्ये सामील व्हावं की, होऊ नये, हा प्रश्न इंग्लंडमध्ये आला. त्याच्याआधी झालेल्या इलेक्शनमध्ये लोकांनी आपला कौल दिलेला नव्हता. म्हणून त्यानी काय केलं? नवीन इशू होता. रेफरण्डम घेतला. आणि रेफरेण्डममध्ये लोकांनी जे सांगितलं तसं ते वागले. आमचं म्हणणं आहे की, तुम्ही रेफरेण्डम घ्यायला पाहिजे होता. तुम्ही रेफरण्डम घेतला नाही. इतकच नव्हे तर शेवटपर्यंत पार्लमेंटलाही अंधारात ठेवलंत, आणि पार्लमेंटलाही तुम्ही विश्वासात घेतलं नाही. पार्टमेंटचही तुम्ही ऐकलेलं नाही. तर यू हॅव नो ॲथॉरिटी टु रिप्रेझेंट दि पिपल् इन धिस रिस्पेक्ट ! म्हणून तुमच्या सहीला जनतेच्या दृष्टीने किंमत नाही आहे. युवर सिग्नेचर इज् नॉट बाईंडिंग ऑन दि पिपल् ऑफ दि कंट्री. तुमची ही जी सिग्नेचर आहे. ही जनतेवर बंधनकारक नाही. म्हणून पन्नास हजार सिग्नेचर्स करा शाई वाळेपर्यंत फाऊंटनची, आमच्यावर त्यादृष्टीने काही फरक पडणार नाही असं आमचं म्हणणं आहे.

आता आम्ही हे म्हटलं, तर म्हणून नुसता ब्रेव्हॅडो झाला असं नाही आहे. आम्हाला याची कल्पना आहे, की, याची रिपर्कशन्स आहेत. याची काही

इम्प्लीकेशन आहेत. आम्ही म्हटलं आम्ही तुमच्या सहीला किंमत देत नाही. जनतेमध्ये आम्ही जागरण करणार आहोत. जनताही याला काही किंमत देणार नाही. आज नाही. पुढे हळूहळू जशी जशी जागृती होईल. परंतु प्रोसेस सुरु होणार.

सर्व प्रथम हल्ला आमच्या सॉव्हरेंटीवर जो व्हायचा आहे, तो आमचे लॉज् अँड आमची कॉन्स्टिटयूशन ह्यामध्ये फरक करावा लागणार आहे. हा पहिला लढा त्यात प्रथम येणार आहे. जोपर्यंत आमचा लॉ आणि कॉन्स्टीटयूशन फरक घेत नाही तोपर्यंत एक पाऊलही पुढे जाता येणार नाही. पार्टमेंटमध्ये घेईल. सुरुवात पार्लमेंटच्या संघर्षातून होईल, रस्त्यावर पुढे संघर्ष होऊ शकतो. जनता अगदीच काही मूर्ख नाही आहे. तेव्हा हा संघर्ष होईल. पण या संघर्षामध्ये, आम्हाला ही कल्पना आहे, की, आम्ही, आमच्या पातळीवर आहोत आणि सरकार, सरकारच आहे ते वरच्या पातळीवर आहे. तेव्हा स्वदेशी जागरण मंच जनतेला जे सांगणार आहे, ते हे सांगणार आहे की या लढाईचं स्वरुप बघा. या लढाईचं स्वरुप जे आहे ते गेल्या दुसऱ्या महायुद्धाच्या सारखं याचं स्वरुप आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळेला, जर्मनी वॉजन् फुल्ली प्रिपेअर्ड. इंग्लंड वॉज नॉट. इंग्लंडमध्ये शांतीपाठ चाललेले होते. विन्स्टन चर्चिलसारख्या एखाद्या माणसानं जर म्हटलं की, हा युद्धाची तयारी करतो आहे, आपणही तयारी करायला पाहिजे तर हे लोक म्हणायचे की, हा वॉर-मॉंगर आहे. त्याला शिव्या द्यायचे, जशी आपल्या इथे शिव्या देण्याची पद्धती आहे. तेव्हा वॉर-मांगर आहे म्हणायचे. म्यूनीचला चेंबर्लेन साहेब गेले, त्यांनी लज्जास्पद तह केला, म्युनिच् पॅक्ट, झेकोस्लोव्हाकिया आणि त्याचे प्रेसिडेंट बेनेस ह्यांचा विश्वासघात करून त्यांनी म्युनिच-पॅक्टवर सही केली. परत आले. लोकांना इतकं बरं वाटलं होतं. एच. जी. वेल्सनीं असं म्हटलेलं आहे. की, आज जर लोकांना असं सांगितलं की, त्यावेळेला, म्युनिच-पॅक्टबद्दल लोकांना बेहद्द आनंद झाला होता असं जर आज सांगितलं तर लोकांना खरं वाटायचं नाही. पुढे आलेल्या घटनांमुळे. पण त्यावेळा लोक फार प्रसन्न होते. एरोड्रमवर त्यांचं स्वागत करण्या करिता फार मोठ्या संख्येत लोक हजर होते. पुढे डाऊनिंग स्ट्रिटवर हजारो लोक त्यांच्या स्वागताकरता

होते. त्यांचं भाषण झालं. ते भाषण इतिहासात नमूद आहे. त्यांनी सांगितलं की, फॉर अस धिस इज दि पीस टाईम, मी पीस घेऊन आलेलो आहे. आणि त्यांच्या भाषणाचं शेवटच वाक्य असं होतं, की, ज्यावर लोकांनी टाळ्या वाजवल्या, 'यू मे गो होम् ॲण्ड हॅव ए क्वायट स्लीप' हे मी इन्व्हर्टेड कॉमॉजमध्ये बोलतो आहे. यू मे गो होम अँड हॅव ए क्वायट स्लीप !' पीपल वेण्ट होम् अँड हॅड ए क्वॉएट स्लीप ! दुसरं महायुद्ध सुरू झालं. हे झाल्यानंतर सगळं बदललं, 'अरे, आम्ही स्वप्नामध्ये होतो का ?' म्हणजे स्वतःला फसवून घेण्यामध्ये आनंद वाटण्याची प्रवृत्ती हिंदुंचीच आहे असं नाही, कधी कधी इतरांनाही हा संसर्गदोष होतो की, स्वतःला, आत्मवंचना, करून घेण्यातच आनंद मानणं. इंग्लंडच्या लोकांच्या लक्षात आलं की ही आपली चूक झाली. त्यानंतर जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये लोक चेंबरलेनच्या विरुद्ध खवळले होते. ८ मे १९४० ला, ज्या वेळी चर्चा झाली त्या वेळेला जी भाषणं झाली, टिपिकल म्हणून लॉईड जॉर्जच्या भाषणाचं उदाहरण देतात. आपल्या भाषणामध्ये लॉईड जॉर्जने असं म्हटलंय, हे ८ मे १९४० चं हाऊस ऑफ कॉमन्सचं भाषण आहे, त्यांनी असं म्हटलं, की आमचे पंतप्रधान आम्हाला असं सांगतात की, जनतेने देशाकरिता त्याग करावा. मात्र योग्य नेतृत्व असायला पाहिजे. आणि त्यागाचाच जर प्रश्न असेल तर देशाला वाचविण्याच्या दृष्टिने यावेळी सगळ्यात महत्त्वाचा त्याग कोणता असेल तर प्रधानमंत्र्यांनी आपले सील्स ऑफ ऑफीस् खाली ठेवणं, प्रधानमंत्रीपद खाली ठेवणं. ही आजची आवश्यकता आहे असं त्यांनी म्हटलं आणि त्यांनी खाली ठेवलं ! आपल्या सारखं अस नव्हतं की, अलाहाबादचं जजमेंट अलं तरी आपणच पुढे चालायचं ! असा तिथे प्रकार नव्हता. आणि लोक देशभक्त असल्यामुळे पुन्हा जे सरकार झालं ते नॅशनल गव्हर्नमेंट झालं. सगळ्यांना घेऊन झालं. त्यामध्ये चेंबरलेन, सगळ्यांना घेऊन हे नॅशनल गव्हर्नमेंट झालं, परंतु त्यांना हे खाली ठेवावं लागलं. चर्चीलनं चार्ज घेतला. त्यावेळेला काय स्थिती होती ? ती जी स्थिती होती ती आज आमची रहाणार आहे. मी आपल्याला म्हटलेलं ध्यानात घ्या, की, धिस् इज ए थर्ड वर्ल्डवॉर वुईथ इकॉनॉमिक वेपन्स. दोन जागतिक युद्धेही मिलिटरी वेपन्सवर लढण्यात

आली. हे आर्थिक वेपन्सनी लढण्यात येणारे हे महायुद्ध आहे. परंतु परिस्थिती ती येणार आहे. तयार नसल्यामुळे इंग्लंडला वारंवार हरावं लागलं. डंकर्क म्हणजे सागरी रस्ता म्हणून इंग्रजांची प्रसिद्धी असूनसुद्धा, डंकर्कमध्ये लज्जास्पद पराभव त्यांना घ्यावा लागला. पण चर्चिलनी लोकांना आधीपासून प्रोलाँग्ड वॉर करताना, लांब युद्धाकरतां आणि त्यागाकरता तयार होण्याची प्रेरणा दिलेली होती. त्यांनी एक स्वप्न मेनिफेस्टो काढलेला नव्हता की, तुम्ही मला व्होट द्या मी तुम्हाला सगळं काही देईन ! त्याने हे सांगितलं की, ब्लड, स्वेट अँड टियर्स हेच मी तुमच्यापासून मागणार आहे. ब्लड, स्वेट, आणि टीयर्स म्हणजे, रक्त, घाम आणि अश्रु हेच तुम्हाला मागणार आहे आणि दीर्घकाळापर्यंत आपल्याला हा सगळा त्याग करावा लागणार आहे. आणि त्या वेळेला डंकर्कला जेव्हा पराभव झाला. फार मोठा पराभव झाला. इंग्लंड किती अन्प्रिपेअर्ड होतं. त्या पराभवातून ज्या अॅड्मिरलनी ऑपरेशन सॉल्व्हेज याचा अर्थ असा आहे की, ज्या वेळेला एखादं जहाज बुडतं, त्यावेळेला जास्तीत जास्त सामान आणि माणसं त्यातून वाचवणं याला ऑपरेशन सॉल्व्हेज म्हणतात. तर ऑपरेशन सॉल्व्हेज त्यांनी सक्सेसफुली केलंय अॅडमिरलनी म्हणून त्याला अॅवॉर्ड देण्यात आला. आणि त्यानंतर प्रत्येक लढाईच्या वेळेला, जास्तीत जास्त आपलं युद्ध साहित्य व माणसं वाचवून जो माघार घेईल त्याला सक्सेसफुल रीट्रीट ही टर्म चर्चिलनी त्यावेळी काढली. ही किती परस्पर विरोधी वाटणारी टर्म आहे की, सक्सेसफुल रिट्रीट, प्रत्येक ठिकाणी जास्तीत जास्त प्रतिकार करायचा कमीत कमी मनुष्य आणि साहित्य हानी देऊन, पुन्हा मागं वळायचं, परतायचं अशा प्रकारे त्यांनी प्रतिकार करीत करीत माघार घेण्याचा हा कार्यक्रम काही वर्ष चाललेला होता. तर एकीकडे यांना माघार घ्यावी लागली, पण दुसरीकडे चर्चिलनी दुसरा कार्यक्रम सुरु केला होता. जनजागरण जनजागरण ! चेंबरलेन वगैरे जे शांतिप्रिय लोक, त्यांनी जे लोकांना म्हटलं होतं की, गो होम अँड स्लीप क्वायटली. सगळ्यांची झोप उडवून दिलेली होती. राष्ट्राच्या प्रेस्टीजचा, ऑनरचा प्रश्न आहे, लोकांना सांगितलं होतं. युद्ध साहित्याचे कारखाने सुरु झालेले आहेत. महिलांनासुद्धा ट्रॅफिक कंट्रोलचं काम दिलेलं होतं. एकीकडे राष्ट्राला तयार करण्याचं काम

त्याने केलेल होतं. पुढे असं झालं, की, हिटलरने आपल्या प्रोपॅगंडामध्ये लोकांना ही कल्पना दिली होती की, अरे, इंग्लंडला नमविणं ही काय गोष्ट आहे. इंग्लंड इज नेशन ऑफ शॉपकीपर्स, हे दुकानादाराचं राष्ट्र आहे. ते एक दोन वर्षात शरण येईल. या कल्पनेवर, पण प्रोपॅगंड्यामुळे फार जास्त पेशन्सची कल्पना जर्मन लोकांच्या मनात नव्हती. हिटलरने म्हटलं की, इंग्लंड एक दोन वर्षात शरण येणार आहे. जास्त धैर्य, जास्त पेशन्स ही कल्पना नव्हती. यांचा प्रतिकार जसजसा वाढत चालला, ते शरणंगती घ्यायला तयार नव्हते, युद्ध वाढत चाललं, लांबत चाललं तसं ज्यांना वाटत होतं की, हे शॉर्ट पिरीयडचं युद्ध आहे ते जसजसं लांबत चाललं तसतसं जर्मन लोकांचं धैर्य खचत चाललं. त्यांचे पेशन्स खचत चालले आणि इकडे ब्लड, स्वेट अँड टीयर्सची घोषणा केल्यामुळे इंग्लंडच्या लोकांचं धैर्य वाढत चाललं. हळूहळू टेबल्स वेअर टर्ण्ड आणि एक क्षण असा आला की, ज्या वेळेला जर्मन लोकांचं धैर्य खचलेलं होत, इंग्लंडच्या लोकांचं धैर्य वाढलेलं होतं. एका लांब लढाईकरिता आणि लांब त्यागाकरिता आवाहन चर्चीलनी केलेलं होतं. उलट हिटलरनी सांगितलं होतं की, थोड्याच दिवसात सगळं खतम होणार आहे. ही जी वॉर ऑफ नर्व्हज होती, सायकॉलॉजीकल - वॉर फेअर, यामध्ये चर्चीलच्या प्रचारामुळे लोक शांत चित्ताने, पेशंटली, धैर्याने लांब अवधीपर्यंत त्यागास तयार होते. जर्मन लोकांचं धैर्य खचलं. जर्मनी हरला, इंग्लंड जिंकला असा प्रकारचा हा अनुभव आहे.

आम्हाला माहिती आहे की, सुरुवातीला आम्हाला सेट्‌बॅक मिळणार आहेत. हा इकॉनॉमिक वॉर फेअर याचा अर्थ इतकाच आहे की, जसं मिलिटरी वॉर फेअरमध्ये एक भाग जर शत्रूच्या सैन्याने घेतला, आमच्या जमिनीचा एक तुकडा आम्ही म्हणतो की, हा एक जमिनीचा तुकडा शत्रूच्या ताब्यात गेलाय. तिथं एक कंपनी जर मल्टीनॅशनली घेतली, आम्ही म्हणू की, आमचा हा एक जमिनीचा तुकडा त्यांच्या ताब्यामध्ये गेला. हे जायचे आहेत आम्हाला माहिती आहे. पण इन् दि मीनव्हाईल, सायमल्टेनिअस्ली स्वदेशी जागरण मंच आणि देशांतले सर्व देशभक्त हे जनतेला जागृत करण्याचा प्रयत्न करतील. आणि जनता त्यावेळी जागृत होईल त्यावेळेला, अॅट् एव्हरी लेव्हल प्रतिकार

होणार आहे ! कसा प्रतिकार होईल हे आज सांगता येणार नाही. कारण दोन्ही प्रक्रिया चालू आहेत. एकीकडे अमेरिका इज गोईंग डाऊन त्यामुळंच त्यांच्या बुलीग टॅक्टीक्स जास्त वाढताहेत. अमेरिकेला डिफाय करायची प्रवृत्ती जगामध्ये वाढत आहे. थर्ड वर्ल्ड कंट्रीजमध्ये साऊथ-साऊथ कोऑपरेशनची कल्पना वाढती आहे. जी-फिफ्टीनची जी बैठक आता आपल्याकडे झाली त्यावरुनही आपल्या लक्षात येईल की, थर्ड वर्ल्ड कंट्रीमध्ये साऊथ-साऊथ को-ऑपरेशनची कल्पना वाढते आहे. अमेरिकेमध्ये स्वत: गरीब लोक आणि मजूर त्यांच्या देशाविषयी नाराज आहेत. इतकेच नव्हे, आपल्यास आश्चर्य वाटेल की, आपल्या इथे ज्यावेळेला कारगिरलची भागनड झाली अमेरीकेमध्ये ती काही लोकांनी वाचली. तिथं पर्यावरणवादी व मानवतावादी अशा बारा संस्था होत्या. पूर्ण अमेरीकन त्यात कोणी गैर अमेरीकन नव्हते. ते लोक एकत्र आले आणि कारगिलवर रिस्ट्रिक्शन्स घातली पाहिजेत म्हणून या बारा अमेरीकन संस्थांच्या लोकांनी डेमॉन्सट्रेशन्स केली. हे सगळे अमेरीकेतील लोक होते. म्हणजे लोकांना अंधारात ठेवल्यामुळे आज गडबडी होतात. पण जसजशी लोकांना जाणीव होते तसतसं हे लोकांच्या ध्यानात येत की हे काही फार काळ चालू शकत नाही. तेव्हा अशा पद्धतीने जागृती यायला लागलीय, त्याही देशामध्ये यायला लालगीय. इतकंच नव्हे, तर अधिक महत्त्वाच्या आणि कॉम्प्लीकेटेड वाटणाऱ्या प्रश्नांवरसुद्धा जागृती यायला लागलेली आहे. आम्हाला आज असं सांगतात ना, की, अरे तुम्ही काय प्रतिकार करणा? तुमच्यावर किती कर्ज आहे ? या विषयी काही जगांत विचार झालाय की, नाही ? कर्ज आहे म्हणजे काय ? आमच्यावर किती कर्ज आहे ? ते देत गेले आणि आमचे राज्यकर्ते घेत गेले. ते देत गेले, आमचे राज्यकर्ते घेत गेले म्हणून आमच्यावर कर्ज आम्ही मानायचं आहे का ? हे तर स्पष्ट आहे की, हे विदेशी कॅपिटल आणि आमचे राज्यकर्ते यांच्यात साठगांठ आहे ! आणि हे जनतेला अंधारात ठेवून अॅट् द कास्ट ऑफ दि पीपल हे चाललेलं आहे. फार काळ चालत नाही. केवळ लहानसं उदाहरण देतो. फिलिपाईन्समध्ये मार्कोसचं नाव आपण एकलंय. मार्कोसनी एक घोषणा दिली की, आपल्य नॅशनल ऑनरकरता आवश्यक आहे की, आपलं न्यू-क्लिअर प्लॅंट असावं.

सगळ्यांनी स्वागत केलं. मग त्यांनी दोन बिलियन डॉलर्स न्यू-क्लिअर प्लँटकरता बाहेरुन आणले. आणि टेंडर्स मागविले की, कन्स्ट्रक्शन वर्क करता, आधीच ठरलं होतं कोणाला द्यायचं. त्यालाच बोलावलं. त्यावेळचं वर्णन येतं की, टेबलवर मार्कोस आणि तो कॉण्ट्रॅक्टर बसलेला आहे. कन्स्ट्रक्शन वर्कचा ठेका एटीफाईव्ह मिलियन डॉलर्सचा ठरला. मार्कोसच्या खिशातून टेबलच्या वरुन एटीफाईव्ह मिलियन डॉलर्सचा चेक हा कॉन्ट्रॅक्टरच्या हाती आला आणि विदीन टू सेकंडस तोच चेक टेबलच्या खालून पुन्हा मार्कोसच्या खिशात गेला. तो आपला ज्या ठिकाणी होता त्या ठिकाणी राहिला. पुढे या कामाची काहीं प्रगती झाली नाही. तेवढ्यामध्ये मार्कोसची रेजीन संपली आणि ॲक्विनो आली. ही तर जुन्या लोकांची पद्धती आहे की, सिव्हिलाईज्ड गव्हर्नमेंटची, की, जुन्या कंटिन्युईटी, पॉलीसीज चालवायच्या. त्याचला अनुसरून आणि त्यांनी त्या चालवायला सुरुवात केली, तर सायंटीस्टची मीटींग बोलविली. की, बुवा आपल्याला हे करायचयं, काय करायचं ? सायंटीस्टस्नी सांगितलं. बाई तुम्हाला माहिती नाही. आम्ही मारकोसला सांगितल होतं की, धिस् एण्टारय झोन इज अर्थक्वेक झोन. अर्थक्वेक प्रोन म्हणजे ज्या ठिकाणी केव्हाही भूकंप होऊ शकतो असा हा सगळा विभाग आहे फिलिपाइन्सचा. या ठिकाणी न्युक्लीअर प्लँट सारखा प्लँट सुरु करण हा मूर्खपणा आहे. आणि म्हणून त्यानं हे सुरुही केलेलं नाही. तुम्ही कशाला भानगडीत पडता ? तेव्हा तो प्लँट झालाच नाही. प्लँट नाही, दोन बिलियन डॉलर्सचे कर्ज आणि दररोज दोन लाख फिफ्टिफाइव्ह थावजण्डस्. हो इन्टरेस्ट रुपाने त्यांना द्याव लागतं तेव्हा फिलिपाईन्सच्या लोकांनी मागणी केली की जेव्हा जेव्हा राष्ट्रीय कर्ज घेण्यात येत तेव्हा त्याचे बायफर्केशन व्हायलाच पाहिजे. देशावर कर्ज किती आहे आणि कर्ज घेणाऱ्या लोकांवर किती आहे ? कुणाकरता हा खर्च झालेला आहे ? देशाच्या विकासाकरीता जो खर्च झाला तो देशाच्या मिळकतीवर लागू व्हावा. मार्कोस पती-पत्नी करीता जर हा खर्च झाला असले तर तो मार्कस पती-पत्नीने द्यायला पाहिजे. जनता एक पैसा देणार नाही. तेव्हा कर्जाची अशी स्क्रुटीनी व्हावी. आमच्या देशाच्या कर्जाची स्क्रुटिनी करा फार डिटेल्समध्ये जाण्याची आवश्यकता नाही. किती विचित्र आहे पाच हजार डॉलर्स एखाद

लोन आलं म्हणजे आम्हाला वाटत काय आहे ? झालं हे माहिती नसतं, पद्धती माहिती नाही आहे. यातले तीन साडेतीन हजार डॉलर्स तर परदेशी कन्सल्टंट सिस्टमची गॅळती आणि इंटरेस्ट देण्यामध्ये जातात. उरलेल्या दीड हजारपैकी हे डॉलर्सच्या रुपाने आमच्या देशाच्या विकासासाठी येत नाहीत त्यांची जी आऊटडेटेड मशिनरी आहे ती ते सांगितलेल्या किमतीवर आमच्यावर डंप करण्यात येते आणि त्या पाच हजाराची भरती करण्यात येते कुणाचा त्यांच्यामध्ये लाभ होतो आहे ? याची स्क्रुटिनी करा. आम्ही स्वदेशी जागरण मंचातर्फे मागणी करतो ! सगळ्या आमच्या देशावर ऋण किती आहे. त्या पैकी देशाच्या जनतेवरच ऋण किती देशाच्या विकासाकरीता ज्याचा खर्च झाला आहे ते ऋण जायज आहे आणि केवळ मिनिस्टर्स, लिडर्स, आणि ब्युरोकॅट्स यांच्या व्यक्तीगत पारिवारीक या करिता जो खर्च झाला आहे जे कर्ज झालेल आहे ते नाजायज आहे. ते जनतेवर लागू होणार नाही. हे आम्ही स्पष्ट रुपाने सांगू इच्छितो. तेव्हा अशा रितीने जनतेमध्ये हळूहळू जनतेस मिसलिड करण्याचे प्रयत्न आहेत. आपण जनतेला जागृत करु शकतो.

मी आपल्यास सांगितलं की आमच्या देशाच्या लोकांमध्ये विलक्षण त्याग करण्याची शक्ती आहे. तुम्ही त्यांना आव्हान करत नाही. लोक म्हणताहेत की लोक स्वार्थी झाले आहेत. पण तुम्ही जर योग्य आवाहन केलत तर महान त्याग करण्याची प्रत्येक, आमच्या देशभक्तामध्ये ही प्रेरणा आहे. फक्त आवाहन कस करायच हे पुढाऱ्यांना गवसल नाही. किंवा ते तशी इच्छा ठेवत नाहीत. जसं एखादी सतार असावी किंवा फिडल् असाव त्याच्या एखाद्या तारेमधून एक स्वर निघू शकतो तुम्हालाही तो स्वर काढायचाआहे. पण कोणत्या ठिकाणी कोणत्या तारेला छेडल्यानंतर तो स्वर निघतो हे तुम्हाला माहित नाही. तुम्ही इकडे तिकडे सगळ्याच तारा छेडता नी म्हणता की या फिडलमधून या सतार मधून तो स्वर निघत नाही. तसं प्रत्येक नागरीकामध्ये असीम त्याग करण्याची ही शक्ती आहे. कोणत्या तारेला कुठ छेडलं पाहिजे आणि छेडणारा कसा असावा ? जसं लॉईड जॉर्जनी म्हटल आहे. पिपल आर प्रिपेअर्ड फॉर सॅक्रीफाईस प्रोव्हाईडेड देअर इज प्रॉपर लिडरशीप. तेव्हा ती तार कुठे छेडायची हे जर माहिती असेल तर आमचे लोक त्याग करु शकतील.

अधिक न लांबविता मी आपल्याला एक अस म्हणीन की कोणत्याही वॉरफेअर मध्ये सगळ्यात महत्वाच भाग पेशन्स हा आहे. व्हिएतनाम किती छोट राष्ट्र होतं ? आणि अमेरिकेने आपले सैन्य तेथे नवीन पोराच पाठवलं लोकांना असं सागून की दोन तीन वर्षांमध्ये ही लढाई समाप्त होईल अहो व्हिएतनाम किती छोट राष्ट्र आहे. नव स्वतंत्र झालेला. सैन्य नाही, सेना नाही. अमेरिकन सैन्याबरोबर पीच्ड बॅटल, मैदानी लढाई देण्याची त्यांची शक्ती नाही, पण त्यांनी एक ठरविलं की, आम्ही सरेंडर करणार नाही. आणि गुरिला वॉरफेअर, छापीमार लढाई त्यांनी चालू ठेवली. त्यांना वाटलं हे किती दिवस टिकेल ? पण ते लढत राहिले. गुरिला वॉरफेअर करीत राहिले. पाच वर्ष झाली, सात वर्ष झाली, आठ वर्ष झाली, मग अमेरिकेतील लोक रेस्टलेस झाले. कारण अमेरिकेचा पेशन्स फार कमी आहे. ते फार प्रॉस्परस आहेत पण इंपेशंट आहेत. त्यांचा पेशन्स फार कमी आहे. आणि लोकांनी मग मागणी सुरु केली, की, आमच्या पोरांना तिथं मरण्यासाठी पाठविता, कशाला पाठविता ? आमच्या पोरांना मागे येऊंदे. तेव्हा व्हिएटनामसारख्या छोट्या देशासमोर, दहाव्या वर्षी आपली सेना परत घ्यावी लागली. अत्यंत शरमेची गोष्ट अमेरिकेच्या दृष्टीने की, व्हिएटनाम समोर अमेरिका टिकू शकली नाही. त्यांना सेना वापस आणावी लागली. धिस् इज् ए वॉर ऑफ नर्व्हज. या वॉर ऑफ नर्व्हज् मध्ये अनेक शक्ती आपल्याबरोबर उभा राहू शकतात. प्रत्यक्ष स्थिती ही होती की, एप्रिल १९८९ पर्यंत सर्व थर्ड वर्ल्ड कंट्रीज आपल्याला पुढारी मानीत होते. निगोशिएशनमध्ये काय कळ फिरली कोण जाणे. त्यांत बोफोर्सचा संबंधअसेल, नसेल, सिक्युरिटीज् स्कॅमचा संबंध असेल नसेल, परंतु काय कळ फिरली, सर्व तृतीय वर्षांतले लोक भारताकडे, भारत सरकारकडे, मोठ्या आशेने पहात असताना एप्रिल १९८९ मध्ये भारत सरकारने त्यांचा विश्वासघात केला ! त्यामुळे ते फार दु:खी झालेले आहेत. पण त्यांनाही आपली आवश्यकता आहे. थर्ड वर्ल्ड कंट्रीजमध्ये को-ऑपरेशन होऊं शकतं. जनतेचं जागरण होऊ शकतं. आपण आपल्या पद्धतीनं प्रतिकार करीत मागं हटायचंय ही गोष्ट खरी आहे. पण इकडे जनतेची तयारी आम्ही करू शकतो. आणि याबाबतीत एक लक्षात ठेवा की, जास्त काळ जर प्रतिकार

चालला, अमेरिकेची अर्थव्यवस्था एकीकडे तुटते आहे. दुसरीकडे अमेरिकेला प्रतिकार करण्याची इतर देशांची हिंमत वाढते आहे. आणि अशा स्थितीमध्ये काही काळ जर आपण तग धरला, आणि आपण धरू शकतो. कारण हिंदुंमध्ये अनेक दुर्गुण असतील, पण एक गोष्ट निश्चित आहे की, वुई आर दि मोस्ट पेशंट कम्युनिटी इन द वर्ल्ड. पेशन्सबाबतीमध्ये आमचेवर ताण करणारी कम्युनिटी दुसरी कोणताही नाही. आणि अमेरिकेच्या बाबतीत आपल्याला मी हे सांगू शकतो की, दे मे बी मोस्ट प्रॉस्परस ॲपॅरेंटली, बट् दे आर दि मोस्ट इम्पेशण्ट पीपल. त्यांचं पेशन्स फार काळ टिकू शकत नाही. तेव्हा अमेरिकेचा विकेस्ट पॉइंट आहे पेशंन्स, हिंदुंचा स्ट्रॉंगेस्ट पॉइंट आहे. पेशन्स. हे वॉर ऑफ नर्व्हज् आहे. मिलिटरी वेपन्सच्या ऐवजी, इकॉनॉमिक वेपनी, ती लढण्यात येणारी असली तरी शेवटी वॉर ऑफ नर्व्हज् आहे. या वॉर ऑफ नर्व्हजमध्ये जर जनजागरण झालं पाहिजेत इनिशियल सेट्‌बॅक्स् मिळणार आहे. आम्ही जनतेलाही सांगणार आहोत की इनिशियल सेट्‌बॅक्स् मिळणार आहे. एका लांब लढाईची तयारी करावयाची आहे. पेशंटला त्याग करीत रहायचयं. आम्ही करू शकतो, पण इतका काळ आमच्याशी लढणं हे अमेरिकेच्या पेशन्टला झेपणार नाही. आणि त्यामुळे मी असं आश्वासनपूर्वक म्हणू शकतो की, आज जरी ही विषम लढाई अशी वाटत असली, रावण रथ, विरथ रघुविर, तरी लोकांना सत्य आहे जे आहे ते सांगून, असा उथळ प्रोपॅगंडा करून नाही की, हे ताबडतोब होऊशकतं. असं नाही. स्पष्ट सांगून की, बराच काळापर्यंत त्याग करावा लागेल. देशाकरता लोग त्याग करायला तयार होतील. आणि या लढाईत आमच्या पेशन्समुळे आम्हीच विजयी होऊ. ते पेशन्स त्यांच्यामध्ये नसल्यामुळे ते पराजित होतील. आमचा विजय आणि अमेरिकेचा पराजय हे निश्चित आहे. एका लांब लढाईकरिता आपण तयार करू इतकेच म्हणणं मला या ठिकाणी पुरेसं वाटतं.

***

स्वदेशी म्हणजे मार्क्सच्या अर्थशास्त्रासारखी आर्थिक तत्त्वप्रणाली नव्हे.
किंवा बाजाराचे - व्यापाराचे अर्थकारणही नव्हे.
अर्थकारण आणि व्यापार यांनी स्वदेशीची संकल्पना कधीच मर्यादित नव्हती
आणि पुढेही तिला त्याच्या मर्यादा पडणार नाहीत.
स्वदेशीच्या सर्वंकष सिद्धांताच्या कक्षेमध्ये देशाच्या
आणि लोकांच्या राजकीय आणि आर्थिक जीवनाचे घटक
व सांस्कृतिक घटक यांचा समावेश झाला आहे.
स्वदेशी म्हणजे भारतीय राष्ट्रीयत्वाच्या सांस्कृतिक,
राजकीय आणि आर्थिक घटकांचा
सुयोग्य आणि एकात्मिक संयोग आहे.
स्वदेशीमध्ये जीवानाच्या सर्व अंगाचे अद्वैत साधले जाते,
मग ते भौतिक असो वा अध्यात्मिक असो.

मोरया
प्रकाशन